परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज




श्रद्धांजली विशेषांक

अंक ११६ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ डिसेंबर २०१८

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रतिष्ठानला पोरके करून गेले रमाकांत***

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***

***माझा सस्नेह नमस्कार.***

आपल्या मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष कै. श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३) हे दि. २९ सप्टेंबर २०१८ (संकष्टी चतुर्थी) ला हे जग सोडून गेले. त्यांच्यावर श्रद्धांजली अंक काढावा लागेल हे मी कधी स्वप्नातही पाहिले नव्हते. कारण रमाकांत हे म.प्र.चे आजीवन अध्यक्ष राहणार आहेत, ही मनाची ठाम समजूत होती. त्याला कारणही तसेच होते, शेवटच्या श्वासापर्यंत त्यांचे मराठे प्रतिष्ठानचे कार्य अविरत चालू होते. प्रकृती साथ देत नसतानाही तिला झुगारून, वार्धक्याला मागे सारून ते नव्या जोमाने तरुणांनाही लाजवतील अशा उत्साहाने कामे करीत होते. धडाधड संगणकावरून ई-मेल पाठवीत होते. पत्र लिहित होते, सूचना करीत होते. बाहेरगावी असलेल्या किंवा परदेशी वास्तव्य असलेल्या मराठे कुलबांधवांशी संवाद साधत होते. कार्यकारिणी सभेत मार्गदर्शन करीत होते. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभा त्यांच्याच निवासस्थानी होत असत. चहापानस व्यवस्था त्यांच्या पत्नी कै. सौ. शुभाताई आदराने मोठ्या हौसेने करीत असत. शुभाताईंच्या निधनानंतरही रमाकांत विद्वांसांनी त्याच पद्धतीने चहापान व्यवस्था सुरू ठेवली. कशाचीही उणीव भासू दिली नाही. आम्ही कार्यकारी मंडळातले सगळे जमलो की त्यांना काम करायला हुरूप येई. मराठे प्रतिष्ठान त्यांचा जिव्हाळा होता. आम्हा कार्यकर्त्यांवर ते माया

### हार्दिक निमंत्रण

मराठे प्रतिष्ठानचा वर्धापन दिन प्रतिवर्षी पुणे शाखा साजरा करीत असते. यावर्षी दि. २० जाने. २०१९ रोजी त्रिदल सभागृह, झाला सोसायटी, करिष्मा चौक, कोथरूड पुणे ४११०३८ येथे सायं. ६:०० ते १०:०० या वेळेत हा समारंभ साजरा होत आहे.
सर्व कुलबांधवांना आग्रहाचे निमंत्रण. जरूर यावे.

करीत. प्रभाकर श्रीनिवास, हेमंत, शैलेन्द्र, मी आणि इतरही अनेक जणांनी त्यांच्या या आत्मीयतेचा सुखद अनुभव घेतला आहे. माझ्यावरही त्यांचा विशेष लोभ होता. हितगुजचे स्वरूप पूर्वीपेक्षा बदलले आहे ते आता तुमच्या संपादकीयत्वाखाली चांगले निघत आहे असे ते बोलून दाखवीत प्रोत्साहन देत. मलाही त्यामुळे समाधान वाटते असे 'हितगुज'साठी लेख लिहून देत, पानपुरके लागतात त्यासाठीही इंटरनेटद्वारे मजकुर पुरवित असत. अगदी 'कारल्याची बर्फी' ही पाककृती त्यांनी लिहिली होती हे वाचकांना आठवत असेल आणि त्यावर विनोदाने, अुपरोधाने पाककला स्पर्धेत पहिले बक्षिस मला द्यावे असे लिहिले होते. कुलबांधव मराठे प्रतिष्ठानच्या कार्यात हितगुजच्या स्पर्धांमध्ये सहभागी होत नाहीत याची त्यांना खंत वाटत असे. त्यासाठी ते प्रयत्नशील असत. हितगुजच्या ७५व्या अंकासाठी सौ. शुभाताईंची मुलाखत मी घेतली 'ज्ञानतपस्वीनी' सौ. शुभाताई विद्वांस हे लेखाला दिलेले नाव रमाकांतना अतिशय आवडले. तसे त्यांनी बोलूनही दाखविले. पत्नीवर

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

त्यांचे निरतिशय प्रेम होते. कै. सौ. शुभाताईच्या आजारपणातही त्यांनी त्यांची फार काळजी वाहिली जे जे करणे शक्य आहे ते ते त्यांनी केले. योगायोग पहा शुभाताई गेल्या तो दिवस संकष्टी चतुर्थीचाच होता. रमाकांतही गेले संकष्टी चतुर्थीलाच. 'हितगुज' हे आपल्या मराठे परिवाराचे मुखपत्र आहे. दिवसेंदिवस एक दर्जेदार प्रकाशन म्हणून ते नावारूपास यावे त्यासाठी ते वेळोवेळी कुलबांधवांना आवाहन करीत असत. 'हितगुज'च्या स्वयंपूर्णतेसाठी 'हितगुज'ची आजीव वर्गणी रु. २०००/- करण्याचा प्रस्तावही त्यांचाच होता. वेळोवेळी 'हितगुज'ला विज्ञापने त्यांनी दिली. मराठे प्रतिष्ठानला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे त्यांचे धोरण असे. दानशूरपणा त्यांचा मोठा गुण होता. बॉम्बे प्रार्थना समाज संचालित पंढरपूर येथील बालिकाश्रमास त्यांनी भरघोस देणगी दिली. पार्ले येथे हा कार्यक्रम होता. मलाही ह्या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. दूरध्वनी करून सांगितले, 'सुमेधाताई तुम्ही अवश्य या, माझ्या पश्चात् तुम्हाला पाहावे लागेल. संस्थेत काम ठीकपणे चालू आहे की नाही...' मी आणि प्रभाकर दोघेही या कार्यक्रमाला उपस्थित होतो. शनिवारी दि. २१ एप्रिल २०१८ ला सायंकाळी विलेपार्ले 'बॉम्बे प्रार्थना समाज' संचालित प्राथमिक शाळेत हा कार्यक्रम संपन्न झाला होता. 'घेणाऱ्याने ऐके दिवशी देणाऱ्याचे हात घ्यावे' अशी दानतवृत्ती दानशूरपणा त्यांच्या स्वभावात होता. 'मुसाफिराच्या आठवणी' या त्यांच्या पुस्तकाविषयी 'हितगुज'च्या संपादकीय मधून मी समीक्षणात्मक लिहिले त्यावर त्यांची प्रतिक्रिया होती 'तुम्ही फारच अतिशयोक्तीने लिहिले आहे' मी म्हटले तसे नाही जे वास्तव आहे, वस्तुस्थितीला धरून आहे तेच मी लिहिले आहे. अतिशयोक्ती वाटते हा तुमचा नम्रपणा आहे.'

कै. श्री. रमाकांत विद्वांस म्हणजे मराठे प्रतिष्ठानचे एक



मुख्य सल्लागार श्री. रमाकांत विद्वांस
मा. मंत्री नितीन गडकरी यांच्या बरोबर चर्चा करताना



ललामभूत भूषण होते. इतका असामान्य बुद्धीचा, कर्तबगार, चौफेरदृष्टी, अभियांत्रिकी व्यावसायिक, ज्ञानी, टनेल महर्षी (भा.ल.महाबळ यांनी दिलेली पदवी), कर्तव्यतत्पर असे असाधारण व्यक्तीमत्त्व असलेला माणूस विरळाच! मराठे परिवाराचे भाग्य थोर म्हणून आपल्याला ते 'अध्यक्ष' म्हणून लाभले. त्यांना अजून बरेच काही करावयाचे होते, प्रतिष्ठानविषयी अनेक चांगल्या योजना त्यांना कृतीत आणावयाच्या होत्या पण त्या क्रूर नियतीपुढे कोणाचे काही चालत नाही. पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा दोष ना कुणाचा, हेच सत्य आहे.

आजही रमाकांत विद्वांस आपल्यात नाहीत यावर विश्वासच बसत नाही. गीतरामायणकार ग.दि. यांनी म्हटल्याप्रमाणे, 'जीवा सवे जन्मे मृत्यू। जोड जन्म जात। जरा मरण कानन यात्रा पर्व संचिनात।।' अशा पराधीन असलेल्या मानवाचा परमेश्वरी इच्छेपुढे काहीच इलाज नाही हेच खरे.

व्यक्ती गेल्यानंतर त्यांच्या कुटुंबाची हानी होते. कुटुंब दुःखी होते. परंतु काही व्यक्ती गेल्यानंतर संपूर्ण समाजाची हानी होते. कारण त्या स्वतःच्या सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन समाजासाठी जगतात. त्या केवळ व्यक्ती नसतात तर संस्था असतात. त्यांचा समाजाला आधार असतो. अर्थात अशा व्यक्ती देहाने गेल्या तरी त्यांच्या कार्याच्या रूपाने जिवंतच असतात. त्यांचे कार्य पुढे चालविणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. कै. रमाकांतांचा म.प्र.ला मोठा आधार होता. प्रतिष्ठानला 'पोरके' करून गेले रमाकांत. कै. श्री. रमाकांत विद्वांस यांनी मराठे प्रतिष्ठानसाठी जे कार्य केले आहे तेच कार्य पुढे नेण्याचे बळ आम्हांला मिळो आणि परमेश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास शांती देवो अशी समस्त मराठे परिवारातर्फे मी प्रार्थना करते.

*ॐ असतो मा सद्गमय*
*तमसो मा ज्योर्तिर्गमय*
*मृर्त्यो मा अमृतंगमय्।।*

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. ४ डिसेंबर २०१८)

# संवाद कुलबांधवांसाठी

• श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

नमस्कार,

आज आपल्याशी संवाद साधताना मनात संमिश्र भावना आहेत, कारण आपल्या परिवाराचे जुने दुवे हळू हळू निखळत आहेत. आपल्या प्रतिष्ठानचे हे संस्थापक अध्यक्ष कै. सुरेशभाऊंच्या निधनानंतर म्हणजे सन २००० नंतर काही दिवसांमध्ये मी प्रतिष्ठानशी जोडला गेलो, या काळात परिवारातील सर्वांशी परीचय झाला. विश्वस्त, कार्यकारीणी सदस्य या सर्वांकडून खूप काही शिकायला मिळाले. त्यावेळी सर्वश्री अरविंद राव, वि. के. मराठे, लक्ष्मणराव, सि. गो. खांबेटे, वा.ग.मराठे यांच्याकडून खूप काही समजून घेतलं. त्यांनीही मी तरूण अननुभवी असतांनाही विश्वास ठेवला व मी जेवढं शक्य झालं तेवढं आत्मसात करत गेलो. नंतर आनंदराव मराठे हे एकदम खिलाडूवृत्ती असणारे अध्यक्ष प्रतिष्ठानला लाभले व सुसूत्रता आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले व त्यांनी या पदावरून निवृत्ती घेतल्यानंतर रमाकांत विद्वांस हे नावाप्रमाणेच विद्वान व्यक्तीमत्व अध्यक्ष झाले व प्रतिष्ठानची आणखीन भरभराट झाली. अरविंद राव, लक्ष्मणराव, वि.के. हे आता आपल्यात नाहीत व त्यांची उणीव भरून काढण्यात यशस्वी झालेले रमाकांत विद्वांस हेही आपणास सोडून गेले, अकाली नाही म्हणता येणार पण संस्थेमधे पोकळी मात्र निर्माण झाली हे वास्तव आहे. असो, काळ काही कुणासाठी थांबत नाही हेच खरे.

मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून कार्यरत असलेले मुळगांव, गोवा येथील श्री.पर्शुराम उर्फ नंदा मराठे तसेच म्हापसा, गोवा येथील श्री.काशिनाथ मराठे ह्यांचे एकाच दिवशी वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांचे बद्दल सविस्तर प्रदीप मराठे यांनी लिहिले आहेच. मराठे प्रतिष्ठान सर्वांच्या दुःखात सहभागी आहे, व आम्ही सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत आहोत.

हाच मुद्दा पकडून मी आपणास जे नेहमी जे आवाहन करत असतो तेच आवाहन पुनः एकदा करतो. मंडळी आपल्या मराठे परिवाराला एकत्र आणण्यासाठी तन, मन, धन अर्पून ही सर्व मंडळी काम करत होती. आता त्यांच्या या कार्याला पुढे नेण्याची जबाबदारी आपल्यावर आहे तेव्हा प्रत्येकाने थोडा का होईना आपला वेळ प्रतिष्ठानच्या कार्यासाठी द्यावा, तसे आम्हाला कळवावे म्हणजे त्या त्या व्यक्तींचा कसा उपयोग करून घेता येईल ते ठरवता येईल.

आपण सर्व मराठे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आहोत, मात्र आत्तापर्यंत फक्त एकच संमेलन रत्नागिरी येथे झालं. आमची या दोन्ही जिल्ह्यात रहाणाऱ्यास आपल्या कुलबांधव-भगिनींना विनंती आहे की आपण पुढाकार घ्यावा, आम्ही पाठिशी आहोतच, एक अखिल भारतीय संमेलन कोकणात व्हावं, जेणेकरून जे कोकणापासून दूर स्थायिक झाले आहेत त्यांना या भूमीत येण्याची संधी मिळेल. ऋणानुबंध निर्माण होतील. जुने नातेसंबंध नव्याने जुळतील. वेगवेगळ्या ठिकाणी संमेलन झाल्याने त्या प्रदेशातील लोकांना उपस्थित रहाण्याची संधी मिळते. जुन्या आठवणी पुन्हा ताज्या होतात. तेव्हा खरंच विचार करा व तयारीला लागा.

यावर्षी आपण आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी आपल्या परिवारातील उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा सत्कार केला. हा उपक्रम यापुढेही सुरूच रहाणार आहे, तेव्हा आपल्यापैकी किंवा आपल्या ओळखीमधे कोणी अशी विशिष्ट व्यक्ती असतील तर जरूर कळवा, दखल घेतली जाईल.

आपणा सर्वांना दिवाळीचा शुभेच्छा संदेश असलेली पत्रे मिळाली असतीलच. ज्यांचे पत्ते बदलले आहेत अशांची पत्रे परतही आली आहेत. ज्यांचे पत्ते बदलले असतील त्यांनी ताबडतोब नवीन पत्ता कळवावे.

आता थांबतो, पुढील भेट नवीन वर्षात. आपणा सर्वांना २०१९ या येणाऱ्या नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा.

◆

## सुभाषित

आरभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः
आरभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः
विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धं अुत्तम जनाः न परित्यजन्ति। - भर्तृहरी

शंकेने संकटाच्या न करिति सुरू जे कार्य ते नीच होत
येता विघ्ने प्रयत्नी विरमति जन त्या मध्यमा ओळखावे
विघ्ने आली तरीही अति चिवटपणे कार्य ना सोडिती जे
जाणावे श्रेष्ठ त्यांना जगिं सकळ जने मार्ग हा योग्य होय।

# अरे विद्वांस ते अहो विद्वांस!

• भा.ल. महाबळ, मुलुंड भ्रमणध्वनी – ९३२४६७२८७४

**मा**झे मित्र रमाकांत माधव विद्वांस हे २९ सप्टेंबर २०१६ रोजी निधन पावले. ही दुःखद वार्ता मला 'हितगुज'च्या संपादिका, डॉ. सौ. सुमेधा मराठे यांनी कळवली. विद्वांस हा बराच आजारी आहे हे मला त्याच्या माझ्या फोनवरील संवादातून माहीत होतं.

रमाकांत हा माझा वर्गमित्र होता. १९५५ ते १९५८ या काळात, आम्ही दोघेही सांगलीच्या वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये, सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी होतो. वर्गमित्र म्हणजे एका वर्गात बसणारे, पण आमचं नातं तेवढंच नव्हतं. आम्ही दोघंही कॉलेजच्या होस्टेलमध्ये राहत होतो, एका मेसमध्ये जेवत होतो, कॉलेजातील एकमेव कँटिनमध्ये जात होतो. म्हणजे रोज, रविवारी व कॉलेजला सुट्टी असे त्या दिवशीसुद्धा, एकमेकांना पाहत होतो, बोलत होतो. आम्ही दोघेही इस्त्री केलेल्या चेहऱ्याचे नव्हतो, त्यामुळे आमचं छान जमत होतं.

मी व माझे मिरज–सांगलीत राहणारे वर्गमित्र यात एक मोठा फरक होता. मिरज–सांगली येथे राहणारे, इंजिनिअरिंगचे फारच थोडे विद्यार्थी होस्टेलमध्ये राहत. ते घरी राहत व कॉलेजला सायकलवरून येणंजाणं त्यांना सोयीचं व स्वस्त होतं. मी मिरजेचाच, पण माझ्या पालनकर्त्या मोठ्या भावाची बदली कुर्डूवाडीला झाली. केवळ त्यामुळं, भावाला न परवडणारी, होस्टेलमध्ये राहण्याची चैन माझ्या पदरी पडली. याचा एक मोठा फायदा मला झाला. वालचंद कॉलेजमधील कितीतरी विद्यार्थी हे कोल्हापूर, सातारा, पुणे व मुंबई येथून आलेले असत. ते सर्व मला सहजी मित्र म्हणून मिळाले.

मी माझ्या बहुतेक वर्गमित्रांपेक्षा वयानं चार–पाच वर्षांनी मोठा होतो. मी बीएससी (ऑनर्स) ही पदवी घेतली. नंतर मी दोन शाळांत शिक्षकाची नोकरी केली. मग (उशिरा) शहाणपण सुचून, मी इंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश घेतला. माझे आजचे वय ८७ आहे. माझे बरेच वर्गमित्र गेल्या एक दोन वर्षात निधन पावले. ते सारे माझ्यापेक्षा वयानं लहान होते. माझ वयाचं ज्येष्ठत्व, अशा प्रसंगी, मला शापस्वरूप ओझं वाटतं.

१९५८ ते १९६२ या काळात, मी वालचंद इंजि. कॉलेजात नोकरी केली. १९६२ साली, त.ग.ढ.ख. या मुंबईतील इंजि. कॉलेजमध्ये नोकरी मिळाल्यामुळे, मी मुंबईकर झालो. मुंबईत मी सहजी स्थिरावलो याचे श्रेय मी इंजि. कॉलेजातील माझ्या मित्रांना देतो.

हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीमध्ये (एचसीसी) माझ्या वालचंद कॉलेजातील इंजिनिअर मित्रांना भेटण्यााठी मी जात असे. तेथे कुलकर्णी, फडके, जोशी विद्वांस यांच्या बरोबर माझ्या गप्पा होत. इंजिनिअर म्हणून ते काय करतात हे मला त्यांच्या खात्यांच्या नामफलकावरून समजे. व्हिजेटीआयमधील माझे शिकवण्याचे विषय पूर्ण वेगळे होते. त्यामुळे खोलात जाऊन मी त्यांच्या कामांची माहिती विचारत नसे. (या गुणाला, माझ्यासारखे लोक दुसऱ्याच्या भानगडीत लुडबूड न करणं असं म्हणतात. या दुर्गुणाला शहाणे जन चौकसपणा नसणं, ज्ञान मिळवण्याची भूक नसणं असं वानतात.) मी प्राध्यापक होतो. प्राध्यापक काय करतात म्हणजे विद्यार्थ्यांना कसे छळतात हे माझ्या मित्रांना, ते एकदा विद्यार्थी दशेतून (दुर्दशेतून) गेले असल्यामुळं माहीतच होतं. थोडक्यात, आमच्या गप्पा मित्र म्हणूनच होत, इंजिनिअर म्हणून मला विद्वांसचा परिचय 'हितगुज'मुळेच झाला.

मुळात, माझाच मराठे मंडळींच्या 'हितगुज'शी संबंध योगायोगानं आला. माझी आई माहेरहून मराठे नाही, मी महाबळ, माझी पत्नी चितळे, माझ्या मुली लग्नानंतर मराठे झालेल्या नाहीत, माझी सूनही मराठे नाही. म्हणजे तसा मी मराठे प्रूफ आहे! मुलुंड (पूर्व) येथील सुयोग सोसायटीतील (कै.) लक्ष्मणराव मराठे हे माझे उत्तम मित्र होते. 'हितगुज'साठी वर्गणीदार मिळवण्याच्या मोहिमेत ते नेहमी ग्रस्त व त्रस्त असत. वर्गणीदार मिळवण्याची त्यांची पद्धत नावीन्यपूर्ण व यशस्वी होती. ते त्यांच्या कामानिमित्त, सहज नातेवाइकांकडे म्हणून कोणत्याही गावी गेले की त्या गावचे मराठे ते शोधायचे, त्यांच्या परी जाऊन भेटायचे व त्यांना हितगुजची माहिती देऊन वर्गणीदार जोडायचे. 'मराठे तितुके मेळवावे' हे त्यांचे यज्ञकर्म होते. हे सारे का तर 'हितगुज' हे मराठे कुलबांधवांचं मुखपत्र आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हावं व ते खर्चाची बाब ठरू नये यासाठी. त्यांची ही तीव्र धडपड पाहून मी एकदा गंमतीत म्हणालो, ''मी मराठे नाही, महाबळ आहे. तरीही मी तुमच्यासाठी 'हितगुज'चा आजीव सभासद व्हायला तयार आहे. माझी एक अट आहे. मी आडनाव बदलणार नाही, मी महाबळच राहीन.''

लक्ष्मणराव मराठे वर्गणीदार मिळवण्याकरता झपाटलेलेच होते! त्यांनी मला अजीव सभासद करून घेतलं. आडनाव न बदलण्याची माझी अट त्यांनी आनंदानं मान्य केली. त्यांनाच मुळी

फक्त वर्गणीदार हवा होता; मराठे या शुद्ध तुपात त्यांना भेसळ नकोच होती!

मी 'हितगुज'चा आजीव सभासद होतो म्हणूनच मला रमाकांत विद्वांस हा मित्र मराठे विद्वांस या रूपात भेटला. रमाकांत विद्वांस मराठे या माझ्या मित्रांनं टनेल एक्सपर्ट (टनेलमहर्षी म्हणा हवं तर) होऊन धन जोडलं आहे, त्या धनाचं सत्पात्री दान केलं आहे हे मला 'हितगुज'मधून समजलं. 'हितगुज'मध्ये विद्वांसचे इंग्रजीतून टनेलसंबंधीचे लेख प्रसिद्ध होऊ लागले. या लेखामुळं विद्वांसचा व माझा टेलिफोन संवाद घडू लागला. इंग्रजीतील लेखांचा संच विद्वांसनं मला पाठवून दिला. तो वाचल्यानंतर, एके दिवशी मी विद्वांसला फोन केला, ''विद्वांस, मी यापुढं तुला अरे विद्वांस न म्हणता अहो विद्वांस म्हणणार. मी टनेलिंगवरचे व इतरही लेख वाचले आहेत.''

आम्ही दोघांनीही एकमेकांना अहो-जाहो असं म्हणायचा निर्णय घेतला खरा, पण स्वभावावर कशी मात करणार? 'स्वभावः दुरतिक्रमः' हेच खरं. अहोवरून चालू होणारा आमचा संवाद अरे वर उतरायचा!

विद्वांसचे इंजिनिअरिंग कामातील अनुभव मराठीत यायला हवेत, ते काम विद्वांसनंच करायला हवं असा धोषा मी लावला. 'मुसाफिराच्या आठवणी' हे वेगळ्या प्रकारचं आत्मचरित्रपर पुस्तक त्यानं पूर्ण केलं. विद्वांस हा अव्वल दर्जाचा, अनुभवी व टनेलिंगच्या क्षेत्रातील यशस्वी सल्लागार इंजिनिअर कसा झाला हे समजून घेण्यासाठी, त्यानं लिहिलेलं, 'मुसाफिराच्या आठवणी' हे पुस्तक वाचायला हवं. (प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे (प) पिन ४००६०२ पृष्ठे १७३ किंमत रु.३५०/-) विद्वांस या इंजिनिअरनं केलेलं हे 'ललित' लेखन आहे. मजेत वाचावेत असे हे देशातील-परदेशातील अनुभव आहेत. इंजिनिअरिंग क्षेत्रात येणाऱ्या अडचणींच्या या मनोरंजक आठवणी आहेत.

या पुस्तकातून, इंजिनिअरंना कामांची निविदा (टेंडर) भरताना, कामं मिळवताना, ती पुरी करताना, कामांच्या ठिकाणी किती समस्यांना तोंड द्यावं लागतं हे विद्वांसनं मांडलं आहे. पूल, बोगदे या प्रकारची कामे उभी राहतात व नंतर वाहतूक चालू होते. पण प्रारंभी, तेथे जंगल असते, डोंगर असतात, दऱ्या असतात. शहरी सोयी-सुविधा नसतात. वाघ, बिबळे, अस्वले, रानडुकरे अधूमधून भेट देऊन जातात.

विद्वांस हा सिव्हिल इंजिनिअर पन्नास वर्षे टनेल या विषयात घुसून राहिला. म्हणून तो मी वर लिहिल्याप्रमाणं टनेलमहर्षी झाला. विद्वांसचं वरील पुस्तक म्हणजे विलक्षण अनुभवांची तिजोरी आहे.

'अरे-अहो' असं कोणतंही संबोधन न वापरता, विद्वांसबरोबर बोलावसं वाटलं तर त्याचं 'मुसाफिराच्या आठवणी' हे पुस्तक (प्रस्तावनेतील माझ्या, 'माझे खास मित्र प्रा. भा. ल. महाबळ' अशा उदार उल्लेखासह) मजजवळ आहे. ◆

# कै. रमाकांत विद्वांस - तरुणांसाठी प्रेरणास्थान

बडोद्याचे श्री मोहन मराठे (केमिस्ट) यांनी 'मराठे प्रतिष्ठान'च्या सांगली येथील संमेलनात पुढील संमेलन बडोदे येथे आयोजित करण्याचा प्रयत्न करू असे सांगितले व बडोद्याला आल्यावर त्यांनी हा विचार बडोदेकर मराठे कुटुंबियांसमोर मांडला. सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हे ११ वे संमेलन ठरले आणि मोहन मराठे यांना पहिला फोन रमाकांत विद्वांस यांचा आला...अभिनंदनाचा. नंतर मराठे प्रतिष्ठान, मुंबईच्या पदाधिकाऱ्यांसोबत वेळोवेळी बैठकी झाल्या. नोकरी असल्या कारणाने मला कुठल्याच बैठकीला येणे जमले नाही. पण मोहनकाकांकडून सर्व माहिति मिळत होती. तेव्हाच जाणवले कि तरुणांनाही लाजवेल असा रमाकांत सरांचा उत्साह. स्मरणिकेसाठी लेख देणे, जाहिरात देणे, आयोजनाचा प्रवास कुठपर्यंत आलाय याची चौकशी करणे, दर १५-२० दिवसांनी मोहन काकांशी फोन वर बोलून उत्साह वाढविणे, नवनवीन कल्पना देणे, तरुणानांही काही वेळा जमत नाही ते ई-मेल द्वारे पत्राचार करणे, व्यवस्थित सुचना देणे यामुळे आम्हां बडोदेकर कार्यकर्त्यांचा उत्साह भलताच वाढला होता.

तब्येत नादुरुस्त असल्यामुळे त्यांना बडोदे संमेलनास येणे जमले नाही पण ही रूखरूख त्यांनी बोलून दाखविली व जमेल तसे मी बडोद्यास येईन असेही सांगितले. संमेलन खूप सुंदर रीत्या संपन्न झाल्याचे त्यांना कळल्यावर त्यांनी अभिनंदनाचे एक पत्र ही मोहन काकांना पाठविले होते.

त्यांच्या उपस्थितीमुळे बडोदे संमेलनास आनंदाची, उत्साहाची एक वेगळीच झालर लागली असती व कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला असता, पण ईश्वरेच्छा बलियसी. त्यांच्या पत्रातील 'अभिनंदन' हीच आमच्यासाठी त्यांनी दिलेली कौतुकाची शाबासकी आहे असे आम्ही मानतो.

प्रत्येक तरुणाने प्रेरणा घ्यावी असे हे रमाकांत विद्वांस सरांचे व्यक्तिमत्व. सर्व बडोदेकर मराठे कुटुंबियांकडून त्यांना आदरांजली!!

**सौ. अंजली आशुतोष मराठे,** बडोदे (पृ.३८०)

# आदरणीय रमाकांत

• श्रीनिवास अनंत मराठे (पृ.३९२), कोषाध्यक्ष (म.प्र), दादर भ्रमणध्वनी – ९८३३२१६४६८

Dear Ramakantaji,

अशी सुरुवात करून आजवर अनेक ई–मेल केले आपल्याला ...... मात्र आता हे सत्र थांबलंय .......

खरं तर आठवड्यात तीन वेळा फोन व साधारण दोन आठवड्यात तेवढेच ई–मेल हा होता आपल्यातला संवाद. विषय मुख्यत्वे प्रतिष्ठानच्या संदर्भातीलच असायचा. कधी मासिक सभेत काय विषय चर्चिले जावेत याविषयी, कधी घटना दुरुस्ती विषयी तर कधी शैक्षणिक व वैद्यकीय मदत योजनांद्वारे अधिकाधिक गरजूंना मदत कशी करता येईल याविषयीचा विचारविमर्ष. खरंतर आपल्या वयातलं अंतर पाहता मला आपल्याला काका म्हणायला आवडलं असतं. पण आपल्याविषयीचा, आपल्या प्रगाढ विद्वत्ते बद्दल असलेला आत्यंतिक आदर, यामुळे इतकी जवळीक साधण्याचं धारिष्ट्य माझ्यात नव्हतं.

आपली ओळख झाली जानेवारी २०११ मध्ये. तेव्हा आपण उपाध्यक्ष होतात प्रतिष्ठानचे. माझ्या काकांना आपल्या कुलवृत्तान्ताची प्रत हवी होती. सुमेधाताईंनी आपला फोन नंबर दिला आणि कुलवृत्तांताची छायांकित प्रत आपल्याकडे मिळेल असं सांगितलं. एका दुपारी मी आपल्या घराचं दार वाजवलं. आपल्या पत्नी शुभाताई यांनी दार उघडलं. माझ्याशी खूप दिवसांची ओळख असल्याप्रमाणे माझं स्वागत केलं. मला थोडं ackward वाटलं. मग आपण आलात आणि मी कुलवृत्तांताची प्रत घेऊन घरी परत गेलो. जेमतेम १५/२० मिनिटांची ती भेट होती. पण प्रतिष्ठानच्या कामाबद्दलच्या आपल्या उत्साहाची एक झलक पाहायला मिळाली.

त्यानंतर लगेचच म्हणजे मार्च २०११च्या अंकासाठी ‘कुलवृत्तांत : बदलते संदर्भ’ हा माझा लेख आपल्या प्रतिष्ठानच्या ‘हितगुज’ या मुखपत्रात प्रसिद्ध झाला. हा माझा प्रतिष्ठानशी आलेला आणि पुढे घनिष्ट होत गेलेला पहिला संबंध. कुलवृत्तांत Web-Database स्वरुपात प्रसिद्ध करण्याच्या माझ्या आवडीच्या प्रकल्पाची ती सुरुवात होती. आपल्याला याबाबत कळल्यावर MTNLच्या online directory वरून फोन नंबर घेऊन त्यांना contact कर असा सल्ला आपण दिलात. प्रतिष्ठानच्या सभासदांची EXCEL मध्ये स्वतः बनवलेली व सभासदांच्या निवासाच्या शहरांनुसार sort केलेली ती यादीही मला दिलीत. त्यानुसार सुमारे २००/२५० मराठ्यांना या प्रकारे प्राप्त केलेल्या नंबर्सवर फोन करून, कुलवृत्तांत update करून आंतरजालावर प्रसिद्ध करण्यासाठी माहिती पाठविण्याची विनंती केली. फेब्रुवारी ते मार्च २०११ मध्ये सुमारे २०० ई–मेल करून खास बनविलेल्या EXCEL Sheet मध्ये माहिती पाठविण्याच्या माझ्या आवाहनाला प्रतिसाद होता सर्व मिळून २० जणांचा! आपल्या कुलवृत्तांता विषयी मराठे इतके निरुत्साही का हा मला पडलेला गहन प्रश्न होता. मी नाऊमेद झालो. आपण तेव्हा कार्योपाध्यक्ष होतात व आनंदराव कार्याध्यक्ष. आपण दोघांनी १०% म्हणजे अप्रतिम प्रतिसाद आहे अशी समजूत काढून मला प्रोत्साहन दिलंत.

कालांतराने म्हणजे जून २०११ पासून मला प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीच्या मासिक सभांना उपस्थित राहण्याबद्दल विचारणा झाली आणि मी दर महिन्याच्या सभांना उपस्थिती लावू लागलो. १९९४ –९५ च्या सुमारास माझे वडील अनंत मराठे प्रतिष्ठानचे सह कार्यवाह होते. परंतु कार्यबाहुल्यामुळे मी प्रतिष्ठानला वेळ देऊ शकत नव्हतो. पण दोन आजारांचा सामना केल्यावर उर्वरित आयुष्य समाजसेवेत घालविण्याचा निश्चय करून मी प्रतिष्ठानच्या कार्यात रस घेऊ लागलो.

‘हितगुज’मध्ये जून २०१२ पासून नियमित प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या आत्मचरित्रात्मक लेखांमुळे आपली नव्यानं ओळख होऊ लागली होती. इंजिनिअरिंग क्षेत्रातील आतरराष्ट्रीय कीर्तीच्या एका ख्यातनाम तंत्रज्ञाचं इतक्या जवळून दर्शन होत होतं. हितगुजच्या स्वयंपूर्णतेसाठी आजीव सभासद शुल्क रु.१०००/– ऐवजी रु.२०००/– करणं का व कसं जरुरी आहे हे स्वतः बनवलेल्या EXCEL Sheet वरून सर्वांना समजावून सांगून त्यावर योग्य ती कार्यवाही करण्याचं आपलं कसब पाहून थक्क झालो. consulting engineer म्हणून कॉम्पुटर वर ५/५ तास काम करून drawings आणि टेंडर्स बनवणारा ‘अवघे पाऊणशे वयमाना’चा आणि पत्नीचं आजारपण आणि आपला व्यवसाय सांभाळून समाजसेवेसाठी देखील तितक्याच आपुलकीने झटणारा ‘एक युवक’ ज्या जिद्दीनं आणि निष्ठेनं काम करतांना पहिला तेव्हा स्वतःचीच लाज वाटली.

२०१३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नवी कार्यकारिणी निवडली गेली. मीही कार्यकारिणी सदस्य म्हणून काम करू लागलो. आनंदरावांच्या स्वेच्छानिवृत्तीनंतर आपण कार्याध्यक्ष पदाची सूत्रं हाती घेतली होतीच. आपल्या पुढाकाराने मराठे

प्रतिष्ठानचे संकेतस्थळ marathepratishthan.orgचे नव्याने गठन करण्याची कामगिरी माझ्यावर सोपविण्यात आली व आपल्या व कार्यकारिणीतील इतर सभासदांच्या मदतीने मार्च २०१४ मध्ये आपलं संकेतस्थळ सध्याच्या नव्या स्वरुपात आलं. जानेवारी २०१४च्या सुमारास प्रतिष्ठानचे तत्कालीन कोषाध्यक्ष प्रभाकररावांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे कोषाध्यक्षपद स्वीकारण्याबाबत मला विचारलं गेलं. आपलं प्रतिष्ठान हा एक सार्वजनिक न्यास असल्याने त्याविषयी अभ्यास करून मगच मी ते स्वीकारेन ही माझी अट मान्य करून अखेर २०१४च्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर मी कोषाध्यक्ष पदाची सूत्रं हाती घेतली.

शैलेंद्र, मी आणि हेमंत ही आम्ही तरुण (!) मंडळी आपल्या नेतृत्वाखाली कार्यरत झालो. प्रतिष्ठानच्या कार्यात preofessionalism ची जरूर आहे हे आपण अधोरेखित केलंत. मग प्रतिष्ठानच्या मासिक कार्यकारिणी सभांची सूचना सुमारे आठवडाभर आधी विषयपत्रिकेसह सर्व सदस्यांना जाऊ लागली. महिन्याभरात आलेल्या देणग्या, सभासद शुल्क, मुदत ठेवींविषयी व एकंदरच प्रतिष्ठानच्या आर्थिक स्थितीबद्दलची माहिती प्रत्येक सभेत दिली जाऊ लागली. झालेल्या खर्चाचे संपूर्ण विवरण कोषाध्याक्षांनी सादर करून कार्याध्यक्षांची लिखित मंजुरी घेण्याची प्रथा सुरू केलीत. प्रतिष्ठानच्या कामकाजात संपूर्ण पारदर्शकता आणण्याचा एक नवा पायंडा आपण पाडलात.

'हितगुज'चं सभासदत्व शुल्क रु.२००० केल्याने बरीच रक्कम २०१२-१३ या आर्थिक वर्षात जमा झाली होती. त्यामुळे आर्थिक वर्ष २०१२-१३ या वर्षासाठीचं आयकर विवरण दाखल होणं अगत्याचं होतं. त्यामुळे प्रतिष्ठानचं २०१२-१३ चं हे पहिलंच आयकर विवरण मार्च २०१५ मध्ये दाखल केलं. त्यानंतर एप्रिल २०१५ मध्ये २०१३-१४ चं आयकर विवरण दाखल केलं. तद्नंतर प्रतिवर्षी आपण प्रतिष्ठानचे आयकर विवरण सादर करीत आहोत व एकाही वर्षी आयकर देय न होता कापल्या गेलेल्या TDS चा Refund दरवर्षी मान्य होत आहे. आयकरात सूट मिळण्यासाठी आयकर कायद्याच्या १२A कलमाखाली नोंदणी आवश्यक असते. प्रतिष्ठानच्या उपलब्ध कागदपत्रात याचा पुरावा न मिळाल्याने दाखल केलेल्या पहिल्या दोनही आयकर विवरणा संदर्भात Demand Notice मिळाली. आपल्या प्रयत्नाने सदर १२A अंतर्गत नोंदणीपत्राची नक्कल आपली वैयक्तिक आयकर विवरणे भरणारे CA विनायक राव यांच्या मार्फत मिळवून त्या Demand Notice विरुद्ध appeal दाखल केले. नुकताच म्हणजे ऑक्टोबर २०१८ मध्ये त्या appeal च्या संदर्भातील प्रतिष्ठानला अनुकूल असा निकाल मिळाला असून या दोन वर्षांची Revised Returns भरून १२A चे सर्व फायदे मिळून Demand केवळ रद्द न होता त्या वर्षांचा Refund मिळण्याची शक्यता आहे. दुर्दैवाने ही प्रतिष्ठानच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची बातमी ऐकण्यासाठी आपण आज आमच्यात नाहीत याचं दुःख आहे.

धर्मादाय आयुक्त कार्यालयात संपर्क वाढवून प्रतिष्ठानच्या Trust Deed ची प्रत आपण प्राप्त केली. नंतर २०१५-१६ मध्ये धर्मादाय आयुक्त कार्यालयाने उगारलेल्या बडग्याच्या तावडीतून सुटण्यासाठी २००४-०५ पासूनचे सर्व आर्थिक विवरणे तसेच त्याकाळापासुनचे फेरफार अर्ज मी, कार्यवाह हेमंत व शैलेंद्र यांनी मिळून दाखल केले. या आदेशाचे पालन न करू शकल्याने महाराष्ट्रात सुमारे १,३०,००० धर्मादाय संस्थांची मान्यता रद्द झाली. आपल्या दूरदर्शीपणामुळे प्रतिष्ठान यातून सहीसलामत सुटले ही देवाची नव्हे तर आपली कृपा.आहे.

२०१५च्या सुरुवातीस आपण शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्र यावर भर देण्याचा मनोदय व्यक्त केलात. एवढ्या वर्षात प्रतिष्ठानकडे जमा झालेल्या गंगाजळीचा फायदा कुळातील जास्तीत जास्त 'आर्थिक दृष्ट्या गरजू' लोकांना व्हावा ही कळकळ त्यामागे होती. त्यानुसार सर्वप्रथम प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या पारितोषिकांच्या रकमेत वाढ व्हावी अशी सूचना आपण लगेचच प्रत्यक्षात आणली. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मार्कांच्या अनुषंगाने पारितोषिकांच्या रकमांमध्ये भरघोस वाढ केली व या पारितोषिकांना विशेष सन्मान मिळवून दिला. तसेच प्रतिष्ठानच्या शैक्षणिक, वैद्यकीय मदत व हितगुज या तीनच उद्देशांना प्राधान्य देऊन अनेक सन्मान्य पण अनावश्यक वा अव्यवहार्य उद्देशांशी संबंधित निधींचे या तीन निधींत पुनर्गठन करावे ही आपली कल्पना २०१५च्या वार्षिक सभेत मान्य झाली. आयकर कलम १२A अंतर्गत नोंदणीमुळे आयकरातून सूट मिळण्यासाठी उदिष्टांसाठी प्राप्त देणग्या, सभासदत्व आदीद्वारे प्राप्त रकमेपैकी ८५% रक्कम त्याच वर्षी खर्च करण्याचे बंधन असते. त्यानुसार शैक्षणिक कर्ज वा कर्ज स्वरूपातील वैद्यकीय मदत ही कर्ज म्हणून न देता मदत म्हणून द्यावी ज्यायोगे प्राप्त रकमेचा विनियोग उत्तम प्रकारे होईलच पण आयकर द्यावा लागून त्याचा क्षय देखील होणार नाही ही आपली विचारसरणी होती. आयकर विभागाकडून अस्वीकृत होऊ नये म्हणून अशी मदत देतांना कुठेही दुजाभाव किंवा वैयक्तिक हितसंबंध आड येऊ नयेत ही आपली भूमिका होती. त्यानुसार या दोन्ही प्रकारच्या मदतीसाठी आपल्या पुढाकाराने कार्यकारिणीच्या सभांमध्ये नियमावली बनविण्यासाठी सर्वच सदस्यांनी यावर चर्चा करून आपले बहुमोल योगदान दिले. सर्व सदस्यांनी एकमताने शैक्षणिक व वैद्यकीय या दोन्ही प्रकारच्या मदतींसाठी एक एक नियमावली स्वीकृत केली व २०१६ च्या वार्षिक सभेत या विषयी चर्चा होऊन ही योजना अमलात आली.

दत्तक विद्यार्थी योजने अंतर्गत २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्रतिष्ठानने रु. ९५,०००/- तर २०१८-१९ या आर्थिक वर्षात १,३१,०००/- शैक्षणिक मदत योजनेअंतर्गत दिले आहेत. या बद्दल अनेक विद्यार्थी आपल्या ऋणात राहतील.

२०१५ च्या पुणे येथील वार्षिक सर्वसाधारण सभेत आपण प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपस्थित राहू शकला नाहीत. पण त्या सभेत कार्यवाह हेमंत यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन ७/८ युवक प्रतिष्ठानसाठी कार्य करण्यास उद्युक्त झाले. कार्यकारिणीतील एक दोघांची नाखुशी पत्करून आपण कस्तुरी, संतोष, दोघे श्रीपाद, अमेय, मंदार, राहुल, हृषीकेश ह्या उत्साही मंडळींच्या पाठीशी ठाम उभे राहिलात. आपण दिलेल्या प्रोत्साहनामुळे या मंडळींनी जानेवारी २०१६ च्या सांगली येथील कुलसंमेलनाची संपूर्ण तयारी आखणी व नियोजन सांगलीतील विठ्ठलराव, त्यांचे चिरंजीव विश्वेष व स्नुषा अश्विनी यांच्या मदतीने केले. हे संमेलन २२५ कुलबांधवांच्या विक्रमी उपस्थितीत यशस्वीरीत्या पार पाडले. या संमेलनानंतर आपल्या खंडाळा येथील बंगल्यावर या तरुणाईचा विशेष गौरव आपण केलात. २०१६च्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत या पैकी ५ जणांना आपण निवडणुकीद्वारे समाविष्ट करून घेतलं. या तरुणाईला सभासदांशी समन्वय साधणे, संपादिका सुमेधाताई यांना हितगुजच्या प्रसिद्धीपूर्व कामात व वितरणासाठी मदत करणे, प्रतिष्ठानच्या संकेतस्थळाची देखभाल आदी कामे वाटून दिली. नोकरी पेशात असणाऱ्या या मंडळींना समाजसेवा केल्याचे समाधान तर लाभावे पण ऐन उमेदीच्या काळात जबाबदारीची जास्त कामे करावी लागू नयेत या उद्देशाने आपण सोपवलेल्या मर्यादित कार्यभारामुळे हिरमुसले होऊन काही जणांनी जरी माघार घेतली असली तरी आपल्या उद्देशांची जाणीव असणारी काही तरुण मंडळी अजूनही प्रतिष्ठानशी संबंधित आहेत.

आपल्या कार्यकाळात आपण प्रतिष्ठानच्या घटनेत, आपल्या वकिली व्यवसायातील स्नेहयाच्या सहाय्याने, काही महत्त्वाचे बदल सुचवलेत. यापैकी काही बदल २०१० तसेच २०१४ च्या वार्षिक सभांमध्ये देखील संमत झाले होते, दुर्दैवाने आपल्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ३० ऑगस्ट ते २० ऑक्टोबर २०१७ या काळात ३ वेळा आपल्याला रुग्णालयात दाखल करावे लागले होते. त्यादरम्यान झालेल्या प्रतिष्ठानच्या २०१७ च्या वार्षिक सभेत घटना दुरुस्तीविषयक हे बदल पुन्हा संमत करून घेतले गेले. धर्मादाय आयुक्तांकडे आपले केवळ Trust Deed नोंदणीकृत आहे पण आपली घटना नोंदणीकृत नसल्याने सदर बदल फेरफार अर्ज दाखल करून कळविण्याची गरज नसल्याचे कळल्यावर हे बदल विनाविलंब लागू करण्याची रुग्णशय्येवरून केलेली आपली सूचना कार्यकारिणीने लगेचच आमलात आणली.

गतवर्षीच्या गंभीर व जीवघेण्या आजारातून आपण सुखरूप बरे झालात ही केवळ परमेश्वराची कृपा नव्हती. आपली असामान्य जिद्द, जगण्याची प्रबळ इच्छा व कमालीचा सकारात्मक दृष्टीकोन यांच्या जोरावर आपण या सर्व आपदांवर मात करीत मृत्यूला पराभूत केलंत. वयाच्या पंचाहत्तरीनंतर पडण्याचं निमित होऊन मांडीतील हाड मोडल्यानं फेब्रुवारी २०१६ मध्ये शस्त्रक्रिया करावी लागली होती. त्यावेळी देखील आपल्याला तारण्यासाठी कारणीभूत होता आपला हाच दृष्टीकोन. नियमित व्यायाम व सराव करून दोन जिने चढून जाण्यापर्यंत आपण प्रगती केली होती. केवळ जिद्दीच्या जोरावर आपण त्यातून बरे झाला होतात. या काळातही प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीच्या सर्व मासिक सभा माझ्या घरीच घ्याव्यात हा तुमचा आग्रह होता. कधी कधी त्रास होत असूनही व्हील चेअर वर बसून आपण या सभांचं नेतृत्व केलंत.

आपली जसजशी ओळख वाढू लागली तसतसा आपल्याविषयीचा आदर वाढतच गेला. आपल्या मातोश्रींच्या श्रीमती रमाबाई रानडे यांच्याशी असलेल्या नात्यामुळे उंच माझा झोका या कार्यक्रमात आपला विशेष गौरव झाल्याचे कळले. न्यायमूर्ती रानड्यांच्या निफाड येथील स्मारकासाठी आपण काही लाखांची देणगी दिलीत. एवढंच नव्हे तर आपल्या आप्त-स्वजनांच्या स्मृतीप्रीत्यर्थ विविध अनाथाश्रमांना, बालिकाश्रमांना भरघोस देणग्या देऊन आपण उपकृत केले आहे. मराठे प्रतिष्ठानला देखील आपण वेळोवेळी आर्थिक सहाय्य दिले आहे.

यावर्षी प्रतिष्ठानशी संबंधित सुमारे ५ व्यक्तींचा सत्कार करण्याचा योग आल्याने आपल्याला विशेष समाधान होते. प्रतिष्ठानचे असे खास मानचिन्ह असावे याविषयी आपण विशेष आग्रही होतात. त्याविषयीच्या आपल्या कल्पना प्रतिष्ठानच्या Whatspp ग्रुपवर मांडून इतरांनाही उद्युक्त करून अशा मानचिन्हाच्या प्रतीकृतीविषयी त्यांच्या कल्पना जाणून घेतल्यात. शेवटी या विषयातील तज्ज्ञ व्यक्तीकडून अशी मानचिन्हे बनवून घेऊन या पाच गौरव मूर्तींना आपण ती वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रदान केली. आपल्याला झालेला आनंद आणि विशेषतः आपल्या कार्याध्यक्षपदाच्या मुदतीत हे भाग्य लाभल्याविषयी असलेली कृतकृत्यतेची भावना आपण आमच्यापासून लपवू शकला नाहीत. प्रतिष्ठानला मदत करण्यासाठी आपण अजूनही उत्सुक होतात. आपल्याला आस होती ती प्रतिष्ठानच्या वतीने अजून एखादा स्तुत्य उपक्रम सुरु करण्याची ज्याद्वारे आपण प्रतिष्ठानला भरघोस मदत करू शकाल. या दृष्टीने, कुळातील परदेशगमन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष मदत करता यावी म्हणून कुळातील समविचारी व्यक्तींशी संवाद साधून त्यांचे याविषयीचे मत जाणून घेण्यासाठी

आपण मृत्यू पूर्वी केवळ दोन दिवस आधी एक पत्र लिहिलं होतं. आपल्या Computer वरील प्रतिष्ठानविषयक माहितीच्या files मध्ये ते मला मिळालं. माझ्याकडे हा विचार बोलून दाखविल्यावर मी लगेचच आपण सुचवलेल्या व्यक्तींचे पत्ते आपल्याला दिले होते. ही गोष्ट दि. २३ सप्टेंबरची. आपल्या पत्राची तारीख होती २५ सप्टेंबर आणि वेळ होती ८:३० p.m.. आपण प्रतिष्ठानसाठी केलेलं हे शेवटचं कार्य ठरावं अशीच त्या क्रूर नियतीची इच्छा होती. आपल्या आजाराने क्षणात डोके वर काढले २८ सप्टेंबरला सायंकाळी ५:४५ च्या सुमारास आपल्या Attendant चा फोन आला की असाल तसे लवकर या. १२ व्या मिनिटाला मी आपल्या घरी पोचलो पण काही उपचार होण्याआधीच दैवाने घात केला. आपली प्राणज्योत अनंतात विलीन झाली होती.

एवढंच म्हणेन...... रमाकांतकाका....मला भेटलेल्या काही असामान्य व्यक्ती ज्यांच्याविषयी नितांत आदर वाटावा अशांपैकी तुम्ही एक होता. तुमच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

◆

# आपणा सर्वांचे रमाकांतकाका

• कालिदास बाळकृष्ण मराठे (पृ. ५४१) भ्रमणध्वनी : ९४२३८८२२९०

२८ सप्टेंबर २०१८ आपल्या प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रमाकांतकाका विद्वांस यांच्या निर्वाणाचा दिवस. आपल्या सर्वांसाठी वाईट दिवस.

सन २००७ मध्ये आपल्या प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळात त्यांनी प्रवेश केला आणि उपाध्यक्ष आणि त्यानंतर कार्याध्यक्ष म्हणून मृत्यूपर्यंत त्यांनी प्रतिष्ठानच्या कामात झोकून दिले.

माझी प्रथम भेट पुण्यात डिसेंबर २००९ मध्ये झाली आणि त्यानंतर शेवटची भेट १६ ऑक्टोबर २०१६ च्या सर्वसाधारण सभेत झाली.

त्यांच्या कार्यकाळात प्रतिष्ठानला न्यास म्हणून कायदेशीर पूर्तता होण्यासाठीची प्रक्रिया त्यांनी पूर्ण केली.

प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष या नात्याने वर्षातून दोन वेळा सभासदांशी वैयक्तिक संपर्क साधण्यासाठी जे पत्रलेखन केले ते प्रतिष्ठान काय कार्य करते आहे याचा परिचय करून द्यायचे.

त्यांनी 'हितगुज' या आपल्या मुखपत्रात लेखन केले ते आजही वाचण्यासारखे आहे आणि त्यांचा खरा परिचय करून देणारे आहे. 'मुसाफिरांच्या आठवणी' हे त्यांचे पुस्तक पर्यटन विषयावरचे अप्रतिम प्रस्ताव आहे जे सर्वांनी वाचायला हवे.

खापरपणजोबाची इंजिनियरींगची परंपरा त्यांनी चालविली आणि टनेल मॅन – बोगदापुरुष म्हणून साऱ्या देशात जी ख्याती मिळविली ती आपल्या सर्व बांधवाना अभिमानाने सांगण्याची अशी गोष्ट आहे. त्यासंबंधी 'लोकसत्ता' वृत्तपत्रात २३/७/२०१५च्या अंकात विनय उपासनी यांनी 'बोगदा निर्मिती करणारा शिल्पी' या शिर्षकाखाली लिहिला होता. आपल्या 'हितगुज' मध्ये सप्टेंबर २०१७ च्या (अंक १११) अंकात प्रसिद्ध केला आहे. अर्थात त्यांनी स्वतः अंक ११० जून २०१७ मध्ये 'बोगदा बांधणीचे तंत्रज्ञान आणि रस्त्यांचे बोगदे' हा लेख लिहून माहिती दिली होती.

इंग्रजीमधून Ramakant Personal Life Sketche मध्ये आपले आत्मवृत्त त्यांनी ७ भागात लिहिले. (अंक ९० ते ९६ जून २०१२ पासून) ते वाचले तर त्यांनी जे यश मिळविले त्यासाठी किती कष्ट घेतले होते ते कळते.

८/१/२०१५ रोजी त्यांच्या पत्नी सौ. शुभा यांचे निधन झाले त्याबद्दल त्यांनी स्वतःच आपल्या पत्निविषयी अंक १७५ मार्च २०१५ जे लेखन केले ते अतिशय हृद्य आहे.

नावात काय आहे, कारल्याची बर्फी, हरहर मराठे सारखे स्फूट लेखन अधूनमधून ते 'हितगुज'मध्ये लिहित ते आजही वाचनीय आहे.

आजारपणामुळे 'हितगुज'चा १०० वा अंक प्रकाशन प्रसंगी आणि बडोदरा येथील संमेलनाला ते उपस्थित राहू शकले नाहीत याचे सर्वांनाच वाईट वाटले.

यावर्षी झालेल्या सर्वसाधारण सभेत ते उपस्थित होते. त्यावेळी यायला पाहिजे होते असे आता वाटते.

असा 'कार्याध्यक्ष' होणे नाही हेच खरे. प्रतिष्ठानच्या कार्याबरोबर इतर सामाजिक संस्थांना त्यांनी भरभरून केलेले दान पण तितकेच महत्त्वाचे आहे.

प्रतिष्ठानचे कार्य पुढे नेणे हीच त्याना खरी श्रद्धांजली ठरेल. त्याबाबतीत गोमंतकीय कुलबांधव मागे राहणार नाहीत. माझ्यातर्फे आणि येथील कुलबांधवांतर्फे आदरांजली वाहून थांबतो.

◆

# उत्साहाचा खळखळणारा झरा - रमाकांत

• श्री. आनंदराव यशवंत मराठे (पृ.२७७), ठाणे भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

रमाकांत... पहिल्याच परिचयात या गृहस्थाने मला खिशात टाकल.

आमच्या दुकानातील साक्षी किंवा अपर्णाचा फोम इंटरकॉमवर आला कि पुढचं अपेक्षित वाक्य ऐकायला मिळायचे. काका तुम्हाला रमाकांत काकांचा फोन आलाय ट्रान्सफर करते.

वयपरत्वे माणसाचा उत्साह कमी होतो. लोकं नैराश्याची भाषा करतात. रमाकांतकडे यातलं काहीच नव्हतं. कायम उत्साह, डोक्यात नविन कल्पना आणि एखादी कल्पना सुचली की त्याची ताबडतोब अंमलबजावणी. एक ताजी-ताजी गोष्ट 'प्लास्टीक खाणारे कीडे'.

हि बातमी त्यांनी वाचली आणि लगेच फोन. अरे आनंदा या किड्यांचा शोध लावणारे आपले मराठेच आहेत. तासाभराने परत रमाकांतांचा फोन अरे किड्यांचा शोध लावणारे राहुल मराठेच आहेत. आताच त्यांच्याशी बोललो आणि येत्या AGMला त्यांनी यायचं पण कबुल केलं आहे. रमाकांतांनी आंतरजालावर सर्व माहिति काढली. डॉ. राहुल यांना फोन करून AGMची सुपारी पण दिली. राहुल मराठे स्वतः मिटिंगला आले. त्यांचा स्लाईड शो पण झाला. त्यांचा हा उत्साह आमच्यासाठी प्रेरणा असायची.

या माणसाकडे नकारात्मक विचारांना थाराच नसायचा. विचार फक्त सकारात्मकच. अखंड उत्साह कंटाळा म्हणून नाहीच. सगळ्या गोष्टीला सदैव तत्पर व तयार. त्यांचं फोनवरच बोलणं माझ्यासाठी टॉनीकच होतं.

एक दिवस सहज गप्पा मारताना मी सहज बोलून गेलो. रमाकांत ह.मो. (मराठे) यांना बंगल्यांवर राहण्याची इच्छा आहे. रमाकांतने मला लगेच फोन लावायचं फर्मान सोडलं. ह.मो.नां. नशिबाने लगेच फोन लागला आणि चारच दिवसात त्यांच्या खंडाळ्याच्या बंगल्यावर रमाकांत, ह.मो., मी आणि खारचे मोहनराव असे भेटलो. वयाचा मुलाहिजा न ठेवता रात्रभर भरपूर गप्पा रंगल्या. झुंजूमुंजू कधी झालं कळलंच नाही. पहिल्याच भेटीत सुप्रसिद्ध निवेदक आपले कै. भाऊ मराठे घट्ट मित्र झाले. परत स्थळ खंडाळा बंगला रमाकांतांचा. माझ्यासाठी या सर्व गोष्टी म्हणजे वाङ्मयीन मेजवानी होती. अर्थात श्रेय सगळंच रमाकांतांना.

अशाच एका सकाळी त्यांचा मला फोन आला. गाडी घेऊन घरी आले आणि तडक खंडाळा गाठला (रमाकांत गाडी फारच जोरात चालवायचे) त्यांच्या कायम कौतुकाचा विषय आलेले त्यांचे भाचे डॉ. विवेक (डॉ. विवेक यांच्याशी माझा परिचय नव्हता.) यांनी त्यांच्या खंडाळ्याच्या घरात पहिल्या मजल्यावर तयार केलेले नितांत सुंदर ध्यानमंदिर दाखवलं. कौतुक करताना सुद्धा ते हात राखून न ठेवता करण्याची त्यांची सवय होती.

माणूस खरा खवय्या, सुरण अथवा कारल्याची भाजी जेवढ्या आवडीनं आणि चवीनं तेवढ्याच आवडीनं Fish-sizzlers.

मराठ्यांच्या तरूणांनी प्रतिष्ठानच्या कामासाठी पुढे यावं म्हणून त्यांनी भरपूर प्रयत्न केले. तरूणांना प्रोत्साहन देण्यासाठी नविन योजना योजल्या. पण म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही ते त्यांच शल्यं होतं.

रमाकांतांना मी बरेच वेळेला नाटकाची तिकिटे काढायला सांगायचो (यशवंतराव चव्हाण नाट्यग्रह त्यांच्या घरा शेजारीच आहे.) एक दिवस असाच तिकिटे घ्यायला मी व पत्नी घरी गेलो रमाकांत घरी नव्हते.

सौ. शुभा वहिनींने दार उघडले. आमच्या हातात तिकीटे दिली आणि एकच वाक्य बोलून गेल्या. यांना (रमाकांत) नाटकाची आवडच नाही. त्यामुळे थिएटर शेजारी असून नाटकं बघणंच होतं नाही .असो

अशा असंख्य आठवणी फक्त उरल्या आहेत.

रमाकांतना हार्दिक आदरांजली.

◆

---

## सुविचार

" सत्य बराबर तप नही । झूट बराबर पाप ।
जाके हिरदे साच है । ताके हिरदे आप ।।

सत्यासारखं लप, पुण्य नाही. असत्यासारखं पाप नाही. ज्याच्या हृदयात सत्य असतं त्याच्या हृदयात परमशक्ती वास करते.

म. फुले -

जशी ज्यांची कर्मे । तशी फळ देती ।
वळण लाविती । संतानास ।।
दृष्ट कर्मे तुम्ही । अजिबाद टाळा ।
पुढे नाही धोकां । मुलांबाळा ।।

# नियतीने डाव साधला

• श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

'हितगुज'च्या सप्टेंबर अंकासाठी लिहितांना असलेल्या भावनांमधे आणि आज या डिसेंबरच्या 'हितगुज'साठी लिहित असताना मनामध्ये येत असलेल्या भावनांमध्ये खूप फरक आहे. त्यावेळी ९ सप्टेंबरला होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभा व आपल्याच कुलबांधवांपैकी विविध क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींचा सत्कार समारंभ या कार्यक्रमाच्या तयारीमध्ये व्यस्त होतो, शिवाय आमचे कार्याध्यक्ष अतिशय उत्साहाने यामध्ये सामील झाले होते. त्यामुळे आमचाही उत्साह द्विगुणित झाला होता. अतिशय भारलेल्या अशा त्या वातावरणानंतर गणपती उत्सवासाठी कणकवलीला गेलो. त्याहीवेळी श्री. विद्वांस यांच्या संपर्कात होतो. तेथून आल्यानंतर २७ सप्टेंबरला सायंकाळी कार्यकारिणीची सभा ठरवण्यासाठी त्यांना फोन केला तर ते म्हणाले मी कळवतो, मला बरं वाटत नाही. बस हेच आमचं शेवटचं संभाषण ठरलं. दुसऱ्याच दिवशी २८ सप्टेंबरला संध्याकाळी श्रीचा फोन आला व आमचे कार्याध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस आम्हाला सोडून गेल्याचं कळलं. बाकीच्यांना कळवून लगेच त्यांच्या घरी गेलो व पुढील सर्व गोष्टी मार्गी लावण्यासाठी हातभार लावला.

अद्यापही हे खरंच वाटत नाही की श्री. विद्वांस आपल्यामध्ये आता नाहीत, मन मानतच नाही, असं वाटतं की कधीही फोन येईल, याला कारण त्यांनी कार्याध्यक्ष झाल्यापासून त्यांनी स्वतः म.प्र.च्या प्रत्येक घटनांचा पाठपुरावा केला. नवनवीन कल्पना राबवण्यात त्यांचा पुढाकार असे, तसेच आम्हाला काम करताना पूर्ण पाठिंबा असे, त्यामुळे काम करण्याचा आमचा उत्साह वाढे. साधारणपणे २०१० नंतर त्यांनी कार्याध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळण्यास सुरुवात केली आणि नंतर एक एक गोष्ट त्यांच्या पाठिंब्याने सुरळीत करण्यासाठी आम्ही प्रयत्न सुरू केले. संस्थेचे नोंदणीपत्र, पॅनकार्ड गहाळ झाले होते ते मिळवणे व संस्थेचे आयकर खात्यातील काम मार्गी लावणे हे मुख्य काम होते. महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही आडवळणाने न जाता ही सर्व कामे अतिशय कमी वेळात पूर्ण केली व त्याचे श्रेय कार्याध्यक्षांनाच जाते कारण त्यांचा पाठींबा असल्याने मी श्रीनिवास व शैलेंद्र उत्साहाने पटापट कामे करत गेलो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे एवढी वर्षे आपल्या संस्थेमधील छोटे छोटे खूप फंड विविध उद्देशांनी बनवले गेले होते, मात्र त्यातील बरेचसे फंड वापरातच नव्हते. यावर अभ्यास करून आपली उद्दिष्टे फक्त शिक्षण आरोग्य व हितगुज प्रकाशन हीच ठेवण्याचे ठरवले व सर्व फंड या दोन फंडांमध्ये विसर्जित करण्यात आले (हितगुज निधी आधीही होताच) शैक्षणिक मदत आपण गेल्या काही वर्षांपासून खूप चांगल्या पद्धतीने देत आहोत व याचे श्रेय कार्याध्यक्षांनाच जाते.

२००८ नंतर आपले अखिल भारतीय संमेलन झाले नव्हते, कारण संमेलनासाठी कुठूनही निमंत्रण येत नव्हते. त्यामुळे आम्ही स्वतः पुढाकार घेऊन सांगली येथे जाऊन तेथील कुलबांधवांना भेटून तेथे त्यांच्या व प्रतिष्ठानच्या कार्यात नव्याने सहभागी झालेल्या युवक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने अतिशय सुंदर संमेलन जानेवारी २०१६ मध्ये सांगलीत संपन्न झाले. त्यापासून स्फुर्ती घेऊन बडोदा येथील श्री. मोहन मराठे यांनी पुढाकार घेऊन जानेवारी २०१८ मध्ये बडोदा येथे संमेलन यशस्वी केले व या दोन्ही संमेलनामध्ये श्री विद्वांस यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. तब्येत साथ देत नसतांनाही घरी संगणकावर व फोन द्वारे होणारी कामे ते करून टाकत, बाहेर आम्ही होतोच. सांगलीत ते उपस्थित होते मात्र बडोद्यात प्रयत्न करूनही प्रकृती बरी नसल्याने उपस्थित रहाता आले नाही व याची कसर ९ सप्टेंबरला झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभा व कुळातील ५ कर्तुत्ववान व सन्मान्य व्यक्तींच्या सत्कार समारंभांचे अध्यक्षपद भूषवून भरून काढली व समाधानाने निरोप घेतला.

आपल्या परिवारातील बरेच कुलबांधव-भगिनी विविध क्षेत्रांमध्ये कर्तृत्व गाजवत आहेत. त्यांचे परिवाराकडून कौतुक होणं ही कल्पना त्यांचीच. कल्पना मनात आल्यानंतर लगेच सर्वांसमोर मांडली व सर्वांची मंजूरी मिळवून त्या कामामध्ये गुंतुन गेले होते. वार्षिक सर्वसाधारण सभा व जोडीला श्री. अजित मराठे पुरस्कर्ता असलेला उद्योजकता पुरस्कार वितरण व हा कौतुक समारंभ तसेच विद्यार्थी गुणगौरव असा भरगच्च कार्यक्रम आखला होता व श्री. रमाकांतजी पूर्ण वेळ अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते. या कार्यक्रमानंतर ते आणि कार्यकारिणीतील आम्ही सर्वजण समाधानी व खूष होतो. पण हे समाधान आम्हाला फार काळ लाभू न देण्याचा डाव नियती खेळली. २८ सप्टेंबर २०१८ला त्यांनी समाधान पूर्वक आपल्या सर्वांचा निरोप घेतला. आम्हाला कायमच त्यांची आठवण येत राहील. पण त्यांच्या मनातील विविध कल्पना ज्या त्यांनी आमच्या समोर मांडल्या होत्या त्या अंमलात आणण्यासाठी प्रयत्न करणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल. ◆

# जबर इच्छाशक्ती व दृढनिश्चयी कै. रमाकांत

• श्री. विजय विष्णू मराठे (पृ.१५२) उपाध्यक्ष मराठे प्रतिष्ठान, पुणे भ्रमणध्वनी : ९४२३०११९४९

**कै.** रमाकांतजी यांचा आणि माझा संपर्क 'मराठे प्रतिष्ठान'च्या सांगली येथील संमेलनात आला. ते संमेलन यथोचित पार पाडण्यात १० ते १२ युवकांचा मोठा वाटा होता. त्यांना योग्य ते साहाय्य कै. रमाकांतजींनी दिले. त्यांचं वय व प्रकृति पाहता त्यांची कामं करायची जिद्द वाखाणण्याजोगी होती. नंतर २०१६ साली मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीसाठी निवडणूक घेऊन एक नवीन प्रयोग देखील केला व तो यशस्वीपणे पार पाडला. प्रतिष्ठानच्या इतिहासात प्रथमच कार्योत्सुक मंडळी जास्त होती व पदसंख्या कमी. त्यामुळे लोकशाही पद्धतीने निवडणूक होऊन कार्यकारिणीची निवड झाली त्यात अनुभवी आणि नवीन असा प्रयोग यशस्वी झाला. तरुणांना स्फूर्ती देणारं त्यांचं व्यक्तिमत्व होतं. सतत काहीतरी नवीन उपक्रमांना प्राधान्य देणे व ते नेटाने यशस्वीरित्या पार पाडण्यात त्यांनी नेहमीच यश मिळवलं.

मध्यंतरी धर्मदाय आयुक्तांनी कायद्यात मोठे बदल अंमलात आणले. किंबहुना असलेल्या कायद्यांची कडक अमलबाजावणी सुरू केली. त्या नुसार जरूर ती कागदपत्रे आयुक्त कार्यालयास ठराविक वेळेत सादर करण्याचे जिकीरीचे काम सुद्धा रमाकांतजी श्रीनिवास आणि हेमंत यांचे पाठीमागे भक्कम उभे राहिल्याने व्यवस्थितरित्या झाले. हे व आयकर खात्याशी संबंधितही महत्त्वाची कामे या त्रयीच्या पुढाकाराने संपन्न झाली. आज प्रतिष्ठान उभे आहे त्याबद्दल त्यांना श्रेय देतांना श्रीनिवासजी आणि हेमंत यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. देशातील विविध मोठमोठ्या बोगद्यांच्या निर्मितीत वाटा असल्याने त्यांनी देशसेवेसाठी हातभार लावला असेच म्हणावे लागेल. नुकतेच काश्मिर येथील चनानी नशेरी या बोगद्याच्या कार्यक्रमाला उपस्थिती ती सुद्धा मार्गदर्शक अभियांत्रिकी सल्लागार या नात्याने खास पंतप्रधानांच्या निमंत्रणावरून हा पण मी एक सन्मानच समजतो. यावरुन ती व्यक्ती किती मोठी होती याची प्रचिती आपल्या सर्वांनाच यावी. गतवर्षीच्या मोठ्या आजारपणात जवळजवळ अडीच महिन्यात रुग्णालयाच्या ३ वेळा वाऱ्या करूनही खचून न जाता तरुणांना लाजवेल असे व्यक्तिमत्व आज आपल्यात नाही यांचे वाईट वाटते. त्यांनी प्रतिष्ठानला कधीच कोणत्याही प्रकारची उणिव भासू दिली नाही. तन-मन तर अर्पिलंच पण धनही कधी कमी पडू दिलं नाही.

२६ सप्टेंबरला मी सिंगापूर मलेशिया सहलीला गेलो असता मला २८ ला रात्री त्यांच्या दुःखद निधनाची बातमी आली. त्यांच्या अंतिम यात्रेस उपस्थित राहू शकलो नाही म्हणून मनापासून वाईट वाटलं. या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी या वयात ४ ते ५ तास उपस्थित रहाणं हे काही सोपं नव्हतं. पण जबर इच्छाशक्ती व दृढ निश्चय या जोरावर त्यांनी ते शक्य करून दाखवलं. आपल्या हातून मराठे कुळाशी संबंधित ५ सन्मान्य व्यक्तींचा सत्कार व्हावा याचं त्यांना खूप अप्रूप वाटलं आणि ते त्यांनी बोलूनही दाखवलं. आज ते जरी आपल्यात नसले तरी त्यांनी दिलेल्या आदर्शानुसार पुढील वाटचाल सुरू राहावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो हीच सदिच्छा.

◆

---

माझी आणि रमाकांतजींची तशी ओळख नव्हती. तसेच कार्यकारी मंडळातीलही कोणीच मला ओळखत नव्हते, पण मी अनेक वर्षांपासून 'मराठे प्रतिष्ठान'चा सभासद ह्या नात्याने समस्त कार्यकारीमंडळाच्या ओळखीचा आहे असा माझा समज होता. कार्यकारिणी व विश्वस्त मंडळ यांत काम करण्यासाठी मुंबई व्यतिरिक्त देशाच्या इतर भागांतील म्हणजे पुणे व बडोदे येथील विजय व मला उद्युक्त करण्यात त्यांची दूरदृष्टी व सर्वसमावेशक दृष्टीकोन प्रतीत होतो. २०१६ च्या पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी प्रथमच 'विश्वस्त' म्हणून निवडून आलो आणि प्रतिष्ठानशी पदाधिकारी या नात्याने जोडला गेलो. यापूर्वी केवळ फोन वरून बोलणे व्हायचे. पण तेव्हा रमाकांतजींना प्रथमच प्रत्यक्ष भेटलो व त्या भेटीतच आमची अनेक वर्षांपासून ओळख असावी असा माझा प्रतिभाव होता. बोगद्यांच्या निर्मितीत 'सिंहाचा वाटा' ही अर्धे पानभर माहिती मराठी लोकसत्तेत त्यांच्याविषयी वाचल्यावर हा माणूस किती हुषार, निगर्वी व समुद्रासारखा खोल व अथांग ज्ञानाचा आहे ह्याविषयी खात्री पटली. त्यांची सभासदांना केलेली लेखी आवाहने कौतुकास्पद व तळमळीची होती. कार्यकारिणीची नेहमीची मासिक सभा, विश्वस्त सभा किंवा वार्षिक सर्वसाधारण सभा हाताळण्याची त्यांची पद्धत छान तर होतीच पण सर्वांना सांभाळून घेण्याची होती. त्यांच्या आत्म्यास ईश्वर सद्गती देवो हीच सदिच्छा!

**मोहन मराठे बडोदा,**(पृ.४२२)
विश्वस्त, मराठे प्रतिष्ठान

# ‘रमाकांत विद्वांस’ आधारवड गेला - प्रतिष्ठान पोरके झाले

**र**माकांत विद्वांस गेल्याचे ऐकून धक्काच बसला दि. ९ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या वार्षिक सभेस सक्रिय असलेले रमाकांतजी आज आपल्यात नाही हे मनाला पटतंच नाही. आजाराशी अक्षरशः झुंज देऊन, शरीराकडून साथ नसताना केवळ आणि केवळ ईच्छाशक्तीच्या बळावर आजाराशी झुंज देणारे रमाकांत आपण विसरू शकत नाही.

त्यांच्याशी माझा परिचय काही वर्षाचाच प्रतिष्ठानचे कामामुळेच झालेला. इतकी कर्तृत्ववान व्यक्ती ही सहजपणे सर्वांशी व्यवहार करते हे पाहून ही व्यक्ती वेगळीच आहे हे लक्षात येते. समोर असलेल्या कामांचा संयमपणे उकल करणे हा त्यांचा हातखंडा. त्यांचा स्वभाव साधारणपणे अबोल वाटणारा. मात्र अधिक परिचयानंतर हा समज खोटा ठरवणारा.

गेले काही वर्षे त्यांची प्रकृति फारशी ठीक नव्हतीच. वारंवार हॉस्पिटलच्या वाऱ्या करून कंटाळलेले रमाकांत व त्यातच पाय घसरून पडल्यामुळे कराव्या लागलेल्या शस्त्रक्रिया. मात्र जबरदस्त आत्मविश्वासाने त्यांनी परत कामाला सुरुवात केली. हे त्यांच्या घरी होणाऱ्या मासिक बैठकीत दिसत असे. मात्र याचा लाभ घेता आला नाही ही खंत आहे म.प्र.च्या मासिक बैठका अनेक वेळा त्यांचे माहिमच्या घरी होत असत. प्रकृती बरी नसतानाही ते अशा बैठकीस हजर राहत असत.

व्यवसायाची आवश्यकता म्हणून ते संगणक व अकौंटनसी ही शिकले होते आणि तेही जवळपास सत्तरी नंतर.

कै. रमाबाई रानडे या त्यांच्या आई/वडिलांकडून नात्यातल्या व रमाबाईवरच्या पुस्तकामागे त्यास सर्व प्रकारचे सहकार्य. तेही पुस्तक आपल्याकडे असेलच.

अशा एक का अनेक बाबी त्यांच्याबाबत लिहिता येतील पण किती आणि काय काय? डोळ्यासमोर आलेल्या काही बाबींचा हा आढावा घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न. प्रतिष्ठानचा डिसेंबर १८ चा अंक हा ‘रमाकांत विद्वांस’ विशेषांक म्हणून प्रसिद्ध होईलच. त्यांना साश्रू नयनांनी आदरांजली.

**सुरेश मराठे**,(पृ. ८७) डोंबिवली
९८७००१७१५०

---

# वाचकांचा पत्रव्यवहार

दि. ९-१०-२०१८

प्रति,
**डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे,**
संपादिका, त्रैमासिक हितगुज (मराठे प्रतिष्ठान)
८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१

महोदया,

सप्टेंबर २०१८ चा अंक कालच मिळाला.

त्यातल्या २ बातम्या वाचून मन विदीर्ण झाले.

१) कै. दत्तात्रेय आत्माराम मराठे, प्रसिद्ध जलतरणपटू, माझे बंधु कै. मनोहर म चक्रदेव व व्याही श्री. सुधीर कोलटकर यांचे जलतरणमधील गाढे स्नेही. त्यांचे मुळेच ते माझेही स्नेही झाले.

मुद्दाम पुण्याला ते मला भेटण्यासाठी येत असत.

त्यांचा आग्रह होता की येरवडा मध्यवर्ती कारागृहांत ‘बंदीजनांसाठी एक मोठा तलाव असावा. बंदींना शिकविण्यासाठी विना मोबदला ते येवूं शकतील. इ.

सर्व व्याधींवर ‘अक्सर’ एकच इलाज. ‘‘पोहोणे’’ आधीच कारागृहांत क्षमतेपेक्षा जास्त कैदी आहेत. त्यांत तलाव कुठे बनवायचा हा प्रश्न त्यामुळे मी खूप प्रयत्न करून सुद्धां ते शक्य झाले नाही. याबद्दल वाईट वाटते. जलतरणपटू कै. दत्तात्रेय मराठे यांना सद्‌गती लाभो हीच उत्कट इच्छा!

२) कै. मुकुंद सीताराम मराठे- आपल्या सहवेदनामध्यें नमूद केल्याप्रमाणे पुणे कार्यकारिणीत काम करतांना, कै मुकुंद रावांचा मला सहवास लागला. कोठेही बैठक असो, १० मिनिटे आधीच कै. मुकुंदराव माझे घरी रिक्षा, स्कूटर घेवून येत असत व अनेक बैठकींना आम्ही एकत्रच जात असूं आतां चिंचवडला आल्यामुळे मला नेहेमी बैठकीला जातां येत नाही, तरी आजारी नसते तर ते चिंचवडला येवून सुद्धा मला घेवून गेले असते. असो

कै. मुकुंदरावांना सद्‌गती लाभो हीच परमेश्वरापाशी उत्कट प्रार्थना

**अच्युत म. चक्रदेव** (पृ.७३२)

*ता.क. स्वर्गात देखील कै. दत्तात्रेय मराठे यांनी देवांना पोहोणे शिकवायला सुरुवात केली असेल, असे वाटते.*

# रमाकांतदादा आणि मी

◆ राधा ठाकूर (पद्मा विद्वांस), अंधेरी

संध्याकाळचे सात वाजले की माझा फोन वाजायला लागायचा. फोन उचलला कि पलीकडून दादाचा चिरपरिचित आवाज यायचा. मामा बोलतोय. मिष्टाबाई काय करतायत? मग माझी नात, मिष्टी, फोनचा ताबा घ्यायची. मामाआजोबाचा फोन आहे हे तिला सांगावं लागायचंच नाही. तिचा लगेच पहिला प्रश्न यायचा मामाआजोबा तू काय करतोयस? आणि मग दोघांच्या गप्पा सुरु व्हायच्या. मिष्टी खळखळून हसली की मला न सांगता कळायचं कि मामाजोबांनी मिष्टीची मस्त फिरकी घेतली असणार. अशाच गप्पा मामाआजोबा आणि मोठी नात निशिता (डॉ. वसुधा आपटे यांची नात) यांच्याही न चुकता रोज चालत असत. माझी मोठी बहिण शशीताई (डॉ. वसुधा आपटे) हिचे दोन नातु सोहम आणि यश हे दोघेही सध्या अमेरिकेत असतात. त्यांच्याशी मामाजोबाचा संपर्क skype वरून व्हिडीओ कॉल वर असायचा. चारही नातवंडांचा आवाज ऐकूनच मामाआजोबाचे कान तृप्त होत असत. २८ सप्टेंबर २०१८ रोजी हा नेम चुकला. आता फोन येत नाही म्हणून नातवंडांचे कान अतृप्त राहतात.

माझा आणि शशीताईचा दादा असलेला आमचा भाऊ हा विवेक, वैभव आणि कृपा यांच्या आगमनानं दादाचा मामा झाला. आणि त्यानंतर नातवंडांमध्ये इतका रमला की त्यानं स्वतःचं नावच मुळी मामाआजोबा करून घेतलं. वडीलधाऱ्यांचा आणि मित्रमंडळींचा रमाकांत, आमचा दादा, भाचरांचा मामा, नातवंडांचा मामाआजोबा याचा पाण्यात साखर विरघळावी तसा लहानथोरांमध्ये मिसळून जाऊन गोडवा पसरवण्यात हातखंडा. या सर्वांना दादाचा मनमिळाऊपणा, दूरदृष्टी, निर्णयक्षमता, बुद्धिमत्ता, प्राविण्य गुणग्राहकता, कामं पार पाडण्याची हातोटी याबद्दल मी वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. समस्त मराठे कुलबांधवांना या सगळ्या गुणांचा पुरेपूर अनुभव आला असेलंच. आग्रहाला मान देणं, समोरच्याचं मन राखणं हा त्याचा मोठा गुण.

मी त्याला सहज फोन करून म्हणावं संध्याकाळी जेवायला येतोस? पाणीपुरी करणार आहे.. त्याचं लगेच उत्तर यायचं हो येतो. तो हो म्हटल्यावर पाणीपुरी हा शब्द विस्तृत समाहार द्वंद्व समास व्हायचा आणि मग एखादं सरबत नाहीतर पन्हं, पाणीपुरी बरोबर शेवबटाटा पुरी, जिलबी किंवा काहीतरी गोडधोड आणि शेवटी आपल्या सर्वांचाच सिग्नेचर आयटम असलेला दहीभात आणि



सांगतेसाठी कोल्ड कॉफी विथ आईस्क्रीम असा बेत व्हायचा. सगळेच आवडीचे पदार्थ...त्यामुळे दादा यथेच्छ ताव मारायचा. मला आणि माझ्या स्वयंपाकाला सुवर्णपदक मिळाल्यासारखं वाटायचं. वास्तविक आजकाल हे सर्व पदार्थ एका फोनकॉल वर घरपोच मिळतात. तरीसुद्धा धाकट्या बहिणीच्या एका फोनकॉलला प्रतिसाद म्हणून आपल्या कामाच्या व्यापातून वेळ काढून मुंबईच्या ट्राफिक मधून ड्रायविंग करून माहीमहून अंधेरीचा पल्ला गाठणं ही बाब ज्येष्ठ नागरिकासाठी सामान्य नक्कीच नव्हे. हौसेला आणि कौतुकाला मोल नाही असं म्हणतात ते हेच.

दादाचं इंजिनिअरिंग क्षेत्रातलं कर्तृत्व सर्वश्रुत आहे. पण दादाचं संगीत क्षेत्रातलं नैपुण्य आवर्जून सांगावसं वाटतं. त्याला जुन्या इंग्लिश, हिंदी आणि मराठी गाण्यांची प्रचंड आवड होती. त्याच्याकडे ध्वनिमुद्रिकांचा खूप मोठा संग्रह होता. अनेक गाणी त्याला पाठ येत होती. कुहू कुहू बोले कोयलिया सारखं शास्त्रीय संगीतावर आधारित गाणं तो शीळ घालून अतिशय बारकाव्यांसह वाजवायचा. तो ब्रिज अत्यंत उत्तम खेळत असे. तो आणि मी रात्री उशिरापर्यंत पत्ते खेळायचो. तो कॅरम खेळण्यात तर कमालीचा प्रवीण होता. तो आणि मी रात्री एक-दीड वाजेपर्यंत कॅरम खेळायचो. आता पुरे झालं किती वाजले बघा असं वहिनी म्हणाली की तो म्हणायचं शुभा, हा शेवटचा बोर्ड... आता पद्माला हरवलं की झालंच. असा शेवटचा बोर्ड तीन चार वेळा व्हायचा.!!

पूर्वी दूरदर्शनवर दर रविवारी हिंदी चित्रपट असे. तेव्हा तो बघण्याची अपूर्वाई असायची. तो मला बटाटेवडे करायला सांगायचा. घरातले आम्ही सगळेच बटाटेवडे खायचो पण दादाची आणि माझी बटाटेवडे खाण्याची स्पर्धा असायची. बटाटेवडे

खाण्याची त्याची आवड त्यानं शेवटपर्यंत जोपासली. २३ सप्टेंबर ला त्याच्याबरोबर खाल्लेले बटाटेवडे शेवटचे ठरले!

आज माझं वय ६७ आहे. अर्थातच मला दादाचा सहवास ६७ वर्षे लाभला. त्यामुळे माझ्या मनात अगणित आठवणींचा अतिशय समृद्ध असा खजिनाच आहे. आज त्या आठवणी लिहितांना दादा असा होता असा भूतकालवाचक उल्लेख करावा लागतोय. त्यामुळे लिहिणं जड जातंय. त्याचं आजारपण, त्याची सहनशीलता, आयुष्याकडे पाहण्याची त्याची सकारात्मक दृष्टी याविषयी लिहू लागल्यावर, आम्ही कुटुंबीय गेल्या वर्ष–दीड वर्षात ज्या ज्या प्रसंगातून गेलो त्यांची आठवणही मनाला अतिशय विषण्ण करतेय. दादाबद्दल सांगण्यासारखं अमाप आहे. पण आता इथेच पुरे करते. गुडविल मधल्या आमच्या घरात आजही दादाच्या व्यक्तिमत्वामधली सकारात्मक उर्जा इतकी भरून राहिली आहे की तीच यापुढे आम्हाला नव्हे आपल्या सर्वांना मार्ग दाखवीत राहील.

◆

# कै. परशुराम (नंदा) दिवाकर मराठे

**दि.** ६ ऑक्टोबर २०१८ रोजी अल्पावधीच्या आजाराने नंदादादा आम्हाला सोडून गेले. गोमन्तक मराठे परिवाराचा एक सक्षम आधारस्तंभ अनंतात विलीन झाला.

कै. दिवाकर व कै. सौ. आनंदी दिवाकर (माझी आत्या) यांचे नंदादादा हे पहिले अपत्य नंदादा – एक उमदे व्यक्तिमत्त्व सदैव कुठल्या ना कुठल्या कामात व्यस्त असले तरीसुद्धा इतरांसाठी त्याच्यापाशी वेळ असायचा. मदतीचा हात सदैव पुढे असायचा.

नंदादाने आपली ऊभी हयात मुळगाव येथील श्री देव रवळनाथचे पुजारी म्हणून संपन्न केली. पण तो फक्त पुजारीच नव्हता तर संपर्कात असलेल्या प्रत्येक व्यक्तीचा आधार होता. आपल्या गावातील लोकांना तसेच मराठे परिवाराला आर्थिक मदत तर करतच होता शिवाय अन्य कोणत्याही प्रकारची मदत विनामूल्य करीत असे आणि विशेष म्हणजे याची कुठेही वाच्यता न करता, नंदादादाची पत्नी, आमची शांती वहिनी नावाप्रमाणेच शांत, सोशिक आणि प्रेमळ स्वभावाची आहे. गुडघेदुखीच्या आजाराने गेली कित्येक वर्षे त्रस्त असूनही त्याचा बाऊ न करता हसतमुखाने सगळे सांभाळते. अशा या मितभाषी वहिनीने दादाला शेवटपर्यंत उत्तम साथ दिली.

साखळी कुळण गोवा येथील योगेश्वरीचे मंदिर उभारण्यात दादाचा सिंहाचा वाटा आहे. जमीन खरेदीपासून ते मंदिराच्या कळसापर्यंत सर्व कामात त्यांनी फार मोठा भार उचलला. उद्देश एकच–आमची कुलदेवी. योगेश्वरीला जाणे सर्वांनाच शक्य होत नाही. म्हणून देवीचीच स्थापना आपल्या गोमंतकात व्हावी. आकाशपाताळ एक करून ती केली हेच त्याच्या स्वभावाचे वैशिष्ट्य, मराठे परिवाराचे ते एक उत्तम हितैषी आधार होते. ‘अखिल भारतीय मराठे कुल संमेलन (अधिवेशन) तिसरे, जे मुळगावला भरले. त्याला तर सर्वतोपरी दादाचीच मदत होती. त्यांचे घरच संमेलन स्थळ झाले होते. जणू खाणे–पिणे, निवास सर्व व्यवस्था दादानी आणि वहिनीने केली. अर्थातच विनामूल्य. मराठे परिवाराला जणू त्यानी वाहून घेतले होते.

इतके सगळे करीत असताना आपली नातीही दादाने तितक्याच आपलेपणाने जपली. कधीही सणावाराला निरोप धाडला तर आपल्या इतक्या कामाच्या भाऊगर्दीतही तितक्याच आठवणीने अर्ध्या तासासाठी का होईना वेळ काढून येऊन जात असे. गेल्यावर्षी डिसेंबर २०१७ मध्ये गोमंतक मराठे परिवार संमेलनाचे औचित्य साधून त्याच्या कार्याची आणि वयाची जाण ठेवून त्याचा परिवारातर्फे गौरव करण्यात आला.

गौरवमूर्तीच्या नात्याने दोन शब्द बोल म्हणताच, ‘माझा सत्कार कशाला? मी काय फार मोठे कार्य केले नाही. ते सगळेच करतात.’ असे त्याच्या स्वभावाला शोभेलसे दादा बोलला. चित्पावन ब्राह्मण संघ गोमन्तक संस्थेनेही त्याचा आवर्जून सत्कार केला.

आपला परिवार, संघ यानी त्याचा गौरव केला. त्याचप्रमाणे कवळे फोंडा येथील शंकर पाठशाळेनेही त्याचा गेल्या गुरू–पौर्णिमेच्या दिवशी सत्कार सोहळा संपन्न केला. त्या सोहळ्याला आम्ही मुद्दाम उपस्थिती लावली. सोहळा खूप छान झाला.

त्यावेळी नंदादादाशी खूप वेळ बोलणे झाले. बोलणे कसले मी ऐकत होते आणि दादा सांगत होता, खूप काही. खरे म्हणजे त्याना माझ्या नव्या घरी आणण्यासाठीच आम्ही गेलो होतो. पण नेहमीप्रमाणेच दादाची अनेक कामे, त्याला कुठला वेळ. नंतर कधी तरी येतो ग, म्हणाला.

ही भेट शेवटचीच ठरली आणि दादा आम्हाला सोडून परत न येणाऱ्या वाटेने मार्गस्थ झाला. दरवर्षी त्रिपूरी पौर्णिमेला गुहागरला व्याडेश्वराला जाणारा दादा साखळी येथील योगेश्वरीच्या पौर्णिमेच्या पालखीला जातीने उपस्थित राहणारा दादा सर्व बांधवांच्या मनाला चूटपूट लावून गेला, परत न येण्यासाठी.

दादाचे कार्य असेच पुढे चालू ठेवण्याची शक्ती परमेश्वर मराठे परिवाराला, आम्हा सर्वांना देवो हीच इच्छा.

दादांना माझे शत शत प्रणाम।।

**– सौ. शुभदा दीपक मराठे** (पृ.५३३), शिरोडा गोवा

# अग्निसंस्कार

• डॉ. सौ. सुमेधा प्र.मराठे (पृ. १२०), वडाळा दूरध्वनी - ०२२-२४१५०८८९

**मा**धवरावांना आज कृतार्थ झाल्यासारखे वाटत होते. कृतकृत्य झाल्याचं समाधान त्यांच्या चेहेऱ्यावर झळकत होतं. त्यांच्या पत्नीची अखेरची इच्छा त्यांनी पूर्ण केली होती. पत्नीला दिलेलं वचन त्यांनी पाळलं होतं.

स्मशानात लाकडे एकावर एक पसरून चिता रचली गेली. माधवरावांची पत्नी, सुमनताईंचा देह चितेवर होता. माधवरावांनी शेवटचा भडाग्नी दिल्यावर क्षणार्धात चिता भडकणार होती, पेट घेणार होती. 'वासांसि जीर्णानी यथाविहाय...' उत्तरक्रियेसाठी आलेल्या भटजींच्या मंत्रघोषाने वातावरण गंभीर झाले होते. नीरव शांतता होती. सगळे स्तब्ध होते. झाडे सुद्धा संपावर गेलेल्या कामगारासारखी हटून स्तब्ध अुभी होती.

...सर्व जण दुःखात बुडाली होती. दुःखात सुख इतकंच म्हणून की काय माधवरावांच्या चेहेऱ्यावर असीम समाधान विलसत होत. तिची शेवटची मनिषा त्यांनी पूर्ण केली. घरातल्या सर्वांची नाराजी पत्करून. माधवराव या आपल्या निर्णयावर ठाम राहिले म्हणून त्यांच्या मुलींना कोण आश्चर्य वाटत होते. स्नेहाला बाबांचा स्वभाव माहित होता. तसे ते आडमुठे नव्हतेच मुळी. मनमिळाऊ होते, जुळवून घेणारे होते. परंतु त्यांच्या काही विशिष्ट तत्त्वांसंबंधी ते कधीही तडजोड करीत नसत. कोणत्याही गोष्टीचे टोक गाठण्यापेक्षा साधलेला समन्वय त्यांना प्रिय होता. ...आणि आज कधी नव्हे इतके बाबा हळवे, हळुवार झालेले मुलींनी पाहिले. त्याही गलबलून गेल्या.

एकादशीसारख्या पवित्र दिवशी, माधवरावांची पत्नी सुमनताई यांनी जगाचा अखेरचा निरोप घेतला. खरं म्हणायचं तर त्यांची सुटकाच झाली. मृत्यू त्यांच्याबाबतीत 'कृपाळू' ठरला. गेली सहा वर्षे त्या कॅन्सरसारख्या व्याधींशी झुंज देता देता थकून गेल्या होत्या. त्यांच्या यातनांचा आणि वेदनांचा प्रवास आता थांबला होता. ऑपरेशन्स, औषधे आणि इंजेक्शने यांना कायमचा विराम मिळाला होता.

...सुमनताई तशा धीराच्या, खंबीर वृत्तीने त्यांनी या संकटाला हसत हसत तोंड दिले. आजारी, व्याधिग्रस्त का होईना पण आई तर आहे - भले पलंगसवाशिण असेल पण घराची शान होती, शोभा होती. गृहलक्ष्मी होती, अन्नपूर्णा होती. मुलींना आईचा आधार होता. तिची प्रेमळ, वत्सल दृष्टी साऱ्या घराला पाहात होती. मुलींना घरी यायला उशीर झाला तर त्यांची काळजी करणारे काळीज होते. पडल्या पडल्या, बसल्या बसल्या घरातील कामे होतील तोवर हौसेने अुरकण्याची तडफ होती. सुमनताईंचे अस्तित्व म्हणजे घराला राखण होती, मायेची पाखर होती.

...आता सुमनताईंच्या जाण्याने हे सर्व संपले होते. त्यांचे जाणे हे तसे अकस्मात नव्हतेच मुळी. त्यांच्या मृत्यूची कल्पना सर्वांना आली होती. कधी तरी हे घडणारच आहे हे माहित होते. सगळ्यांच्या मनाची तशी तयारी हळुहळु होत होती. ''मी गेल्यावर कसे वागायचे, माझ्यावाचून कुठलेही काम अडले नाही पाहिजे, आपापली कामे चोख करीत मन रमवायचे, माझ्या जाण्याचे दुःख उगाळत बसायचे नाही. माझे आशीर्वाद, शुभेच्छा सदैव तुम्हा सोबत राहतीलच; माझा मृत्यू आनंदाने तुम्ही पचवायचा,'' इ. स्वतः ते सुमनताईंनी त्यांच्या निधनानंतर कसे वागायचे हे सांगितले होते.

...अशा सुमनताईंचे शृंगारलेले शव पाहून माधवरावांना रडूच कोसळले. हिरवीगार जरीची लालकाठ असलेली साडी त्यावर तसलाच, जरीकाठाचा ब्लॉऊज, हातात हिरवा चुडा, केसांत फुलांची वेणी, नाकात नथ, त्यांच्या उंच कपाळावर साजेशी मोठी लाल टिकली. सुमनताईंना शृंगारलेले पाहून माधवरावांना भडभडून आले. त्यांना हुंदका आवरेना. स्वतःला कसेबसे सावरीत त्यांनी तुळशीचा मोठा हार त्यांच्या गळ्यात घातला. त्याचक्षणी, त्यांना लग्न लागल्यावर सुमनताईंच्या गळ्यात घातलेल्या घवघवीत, भरघोस, टपोऱ्या गुलाबांच्या फुलांच्या हाराची आठवण झाली आणि ते व्याकुळ झाले.

...थोड्या वेळाने त्यांनी स्वतःला सावरले आणि फ्लॅशबॅक पद्धतीने एखाद्या चित्रपट पाहावा तसे त्या दोघांचे सहजीवनाचे चित्र त्यांच्या मनःश्चक्षूसमोर अुभे राहिले. जणू काही तो काळ जिवंत होऊन ते पुन्हा जगताहेत, पुनः प्रत्ययाचा आनंद विलक्षण होता.

...माधवरावांना, सुमनताईंना पाहायला गेले तो प्रसंग आठवला. सुमनताई गुलबाक्षी रंगीची साडी नेसल्या होत्या. त्या साडीत त्यांचा अस्सल गोरापान रंग अधिकच खुलून दिसत होता. बोलके डोळे, सडपातळ बांधा, लांबसडक केस, मोगऱ्याचा गजरा माळलेला. माधवरावांनी डोळे मिटले आणि अेक दीर्घ श्वास घेतला. मोगऱ्याचा सुगंध घेण्यासाठी. जणु तो मोगऱ्याचा सुगंध अद्यापही त्यांच्या तनामनात दरवळत होता. त्यांनतर लग्नातली,

नाकात नथ घातलेली, अंजिरी रंगाच्या शालूतील नववधू सुमन. नव्या नव्हाळीचे तेज आणि स्वप्नाळू डोळे, तिचा भावूक चेहरा माधवरावांनी जेव्हा हाताच्या ओंजळीत धरला तेव्हाची लाजवंती सुमन. ...प्रेमाने सर्वस्व अर्पण करणारी अर्पिता सुमन. लग्न झाल्यावरचे नव्या नवलाईचे दिवस म्हणजे मोराने फुलविलेल्या पिसाऱ्यासारखे होते. प्रत्येक दिवसाच्या आगळ्या वेगळ्या मोहक छटा. प्रत्येक रंग अेकमेकात मिसळलेला. सुमन नाव माधवरावांनी बदलले नाही, चांगले मन, निष्पाप मन असलेली अशीच नावाप्रमाणे ती सुमन होती. घरादाराची लक्ष्मी, अन्नपूर्णा. तीन मुलींची आई. स्नेहा, प्रिती, तृप्ती - खरं तर मुलगा झाला नसल्याची त्यांच्या मनात खंत वाटून रूखरूख होती. मुली शिकल्या, मिळवत्या झाल्या, सासरी छान नांदतात. संसार सुरेख निगुतीने करतात अशा सद्गुणी मुलींचा अभिमान असणारी सुमन, जावयाचं कौतुक करणारी, नातवांचे लाड करणारी आजीच्या भूमिकेतील सुमन, पूजा-पोथी करणारी आणि मग रोगग्रस्त झालेली. कॅन्सरसारख्या दुर्धर व्याधीशी जिद्दीनं झुंज देणारी सुमन. अशी सुमनची विविध रुपे माधवरावांच्या अंतःचक्षूंसमोर फेर धरून नाचू लागली.

...माधवरावांवर सुमनची 'समजूत' घालण्याचे प्रसंग अधून-मधून येत आणि त्यात ते यशस्वीही होत. त्यांचे युक्तिवाद, समजून देण्याच्या पद्धती यामुळे सुमनच्या मनातील शंका दूर होत असत आणि माधवरावांच्या निर्णयक्षमतेवरचा तिचा विश्वास दृढ होत असे.

...सुमनताईंना तिसरी मुलगी झाली. तेव्हा मुलगा झाला नाही म्हणून त्या खंतावल्या. त्यावेळी मुलगा आणि मुलगी असा भेद मानायचा नाही. आपण अेकविसाव्या शतकात जातो आहोत. हल्ली मुलीच प्रेमाने आई-वडिलांना म्हातारपणी विचारतात. मुलीही आज सर्वच क्षेत्रात कर्तृत्ववान आहेत. आगगाडी चालवून मोटरमन (मोटरवूमन) बनून, अंतराळातील यान चालविण्यापर्यंत स्त्रीने मजल मारली आहे. कोणत्याच बाबतीत त्या पुरुषांपेक्षा मागे राहिलेल्या नाहीत. आपल्या या तिघी 'कुलदीपिका' आहेत. त्यांच्या गुणवत्तेच्या आणि कर्तृत्त्वाच्या आड आपण यायचं नाही. माधवरावांचे हे म्हणणे सुमनताईंना पटले आणि त्यानंतर त्यांनी कधीही मुलगा झाला नाही याचा विषाद वाटून घेतला नाही.

सुमनताईंचे मन वळवून घेण्यात माधवराव तसे वाक्‌बगार होते.

...रुग्ण सुमनताईंच्या उपचारांवर पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागत होता. त्यांची प्रकृती बरी राहावी, यातना कमी व्हाव्यात म्हणून औषधांवर, डॉक्टरांवर खूप पैसा खर्च होत असे. सुमनताईंना याविषयी फार दुःख होत असे. वाईट वाटत असे. माधवराव त्यांना धीर देत व म्हणत, ''पैशाची फिकीर, पर्वा तू करू नकोस. तुला त्रास होऊ नये यासाठी अुपचार घेत राहाणे आवश्यक आहे. तू फक्त मनाने खंबीर रहा. अगं, मन ही मोठी विचित्र गोष्ट आहे. ते माणसाला दुबळे करते आणि शक्तीशालीही तेच करते. तुझ्या मनात जे सामर्थ्य आहे ते पैशांच्या राशीमध्ये नाही. तू आम्हाला हवी आहेस सुमन, खूप दिवस. तेव्हा जास्तीत जास्त जगण्यासाठी, मनाची उभारी ठेव.'' माधवरावांच्या या प्रेमळ समजूतीच्या बोलण्यातून सुमनताईंना जगण्याचे बळ मिळत असे.

...जरी सुमनताई आजारी असल्या तरी रोज पहाटे ५ वाजता, अुठून ध्यान, धारणा आणि प्रार्थना करायच्याच. त्यांच्या या नियमात सहसा कधीही खंड पडत नसे.

...त्यादिवशीची गोष्ट. प्रार्थना, ध्यानधारणा झाल्यावर सुमनताई नेहमीप्रमाणे शांत, प्रसन्न न दिसता काहीशा अुदास वाटल्या. माधवरावांना गंभीरपणे म्हणाल्या, ''मला तुमच्याशी अत्यंत महत्त्वाचे बोलायचे आहे. माझे म्हणणे अैकून, त्याप्रमाणे तुम्हाला वागावे लागेल.''

माधवराव उत्सुक झाले. 'सांग' म्हणाले.

''नाही, पण वचन द्या. मी सांगितल्याप्रमाणे वागेन-करेन म्हणून! आयुष्यभर मी तुमच्या म्हणण्याप्रमाणे वागले. अनेकदा माझ्या इच्छा मारून. हौसे-मौजेच्या कल्पना सोडून, मी तुमच्या म्हणण्याप्रमाणे मन मारून जगले'', सुमनताई निश्चयाने म्हणाल्या.

माधवरावांनी, सुमनताईंच्या हातावर हात ठेवला, किंचित दाबत ते म्हणाले, ''तुझ्या मनात काय आहे ते मोकळपणाने कोणताही आडपडदा न ठेवता निःसंकोचपणे सांग. मी त्याप्रमाणे वागेन तसं वचन देतो मी.''

''मी हे जग सोडून गेल्यावर, मेल्यावर, मला विद्युत्दाहिनीत जाळू नका. माझ्यावर प्राचिन सनातन हिंदुधर्मातील 'अग्निसंस्कार' करावेत. पारंपारिक धार्मिक पद्धतीप्रमाणे योग्य अशा भटजींच्या हातून अन्त्यसंस्कार झाले पाहिजेत. अगदी खरा कावळा शिवेपर्यंत.

माधवरावांनी जड अंतःकरणाने मान हलवून होकार दिला.

अन्त्यसंस्कार कसे करावेत, कसे करणे चांगले याविषयी माधवरावांनी सुमनताईंची समजूत घालण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता कारण माधवरावांनी त्यांना वचन दिले होते. माधवरावांनी वचन दिल्यामुळे असेल सुमनताईंना 'हलके हलके' वाटत होते. मनावरचे मळभ दूर गेले होते. रात्री आभाळातील अभ्र दूर होताच पलीकडचं नक्षत्र चमचमताना दिसावं तसा त्यांचा चेहरा प्रफुल्लित, टवटवीत दिसत होता.

...अेकादशीचा दिवस होता. नित्यनेमा प्रमाणे हरिपाठ म्हणून सुमनताई झोपल्या पण तासाभराने त्या अस्वस्थ झाल्या, कमालीच्या बेचैन झाल्या. माधवरावांनी औषधाची गोळी दिली.

त्यांनी खुणेनेच नको म्हटले. माधवरावांचा हात हातात घेतला, त्यांच्या मांडीवर डोके ठेवले आणि डोळे मिटले ते कायमचेच. सारा खेळ संपला होता. कुडी फक्त उरली होती आत्मा निघून गेला होता. आश्चर्य म्हणजे, सुमनताई नुकत्याच झोपल्या आहेत असेच पाहाणाऱ्याला वाटत होते.

...सुमनताई गेल्याचे त्यांच्याजवळच्या नातलगांना फोनाफोनी करून कळविण्यात आले. नीरनानिरव सुरू झाली. सुमनताईंच्या अंत्ययात्रेची व्यवस्था करू लागले.

सुमनताईंच्या जाण्याच्या आघाताने माधवराव सुन्न होऊन निः शब्द बसले होते.

स्नेहाचे यजमान थोरले जावई म्हणाले, ''मोक्षधाम स्मशानभूमीत नेण्याची व्यवस्था केली आहे. तिथे इलेक्ट्रिकच्या विद्युदाहिनीची सोय आहे.'' हे अैकताच, अेवढ्या वेळ शांत बसलेले माधवराव अुसळून आवेशाने म्हणाले, ''नाही, सुमनचा अन्त्यविधी विद्युतदाहिनीत करायचा नाही. सुमनवर पारंपारिक धार्मिक पद्धतीप्रमाणे अग्निसंस्कार करायचे.''

मुली आणि जावई बाबांच्या निश्चयी, करारी चेहेऱ्याकडे अवाक् होऊन पाहातच राहिले.

...हे अैकून तिन्ही मुली आणि जावई यांना आश्चर्याचा धक्का बसला कारण माधवराव हे शिक्षणाने, वृत्तीने सुधारलेले, आधुनिक विज्ञान तंत्राचे स्वागत करणारे, प्रत्येक गोष्टीत अद्ययावतपणा असावा असा त्यांचा नेहमी आग्रह, याबाबतीत त्यांनी आजवर कधीही तडजोड केली नव्हती.

व्रतवैकल्यांना ते कालबाह्य समजत. आपल्याला जे पटले आहे ते दुसऱ्यांवर लादण्याचा त्यांचा हट्टी स्वभाव होता. त्यामुळे त्यांनी सुमनताईंना कधी वटसावित्री, हरतालिका, मंगळागौरीव्रत, दिवाळसण इत्यादि पारंपारिक प्रथा पाळू दिल्या नव्हत्या. अेकदा माधवराव गंभीर अपघातात सापडल्यावर ते पुन्हा पूर्ववत बरे व्हावेत म्हणून सुमनताईंनी सत्यनारायणाचा नवस केला होता. माधवराव खडखडीत बरे झाल्यानंतर नवस फेडण्यासाठी सत्यनारायण करण्याचा त्यांनी आग्रह धरला. माधवरावांनी तो साफ झिडकारला.

...पण सुमनताईंनी रडवेल्या आवाजात ''मी देवाला दिलेले वचन तरी मला पाळू द्या'' असा आग्रह धरल्यावर माधवराव तयार झाले. तेही अेका अटीवर. भटजीला न बोलावता सत्यनारायणाची पूजा सांगणारी टेप लावून पूजा करायची. ...अखेरीस सुमनताईंनी ते मान्य केल्यावर सत्यनारायणाची पूजा झाली आणि त्यांचा नवस पूर्ण झाला.

...या पार्श्वभूमीवर माधवरावांनी सुमनताई वर पारंपारिक धार्मिक पद्धतीने अन्त्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतल्यावर सगळ्यांनाच आश्चर्य वाटले.

...काही क्षण शांतता पसरली. मग धीर करून माधवरावांच्या लाडक्या कन्येने स्नेहाने विचारले, ''बाबा तुम्ही हा कालविसंगत निर्णय कसा घेतलात? विद्युत दाहिनी सर्वार्थाने अुपयुक्त ठरते. धार्मिक अवडंबर टाळल्यास विद्युतदाहिनीची प्रक्रिया अतिशय सोयिस्कर असते. तरी तुम्ही चितेवर दहन करण्याचा का आग्रह धरता?''

...माधवरावांनी आवंढा गिळला. नकळत त्यांच्या डोळ्यांतून अश्रूही गळू लागले. ...अश्रू पुसून त्यांनी गंभीर आवाजात सांगितले, ''तुमची आई सनातनी मताची होती. विवाहानंतर माझ्या हट्टामुळे तिने स्वतःचे मन मारून माझ्या म्हणण्यानुसार ती वागली. अखेरच्या क्षणी तिने माझ्याकडून तिच्या पार्थिवावर धार्मिक, पारंपारिक पद्धतीने अंत्यसंस्कार करावेत. अगदी कावळा शिवेपर्यंतचे असे वचन घेतले आणि मी ते दिले. जिवंतपणी नाही तर निदान तिच्या मृत्यूनंतर तरी तिच्या इच्छेनुसार वागू या. म्हणूनच पत्नीचे अंत्यसंस्कार धार्मिक परंपरेनुसार पूर्ण झाल्यावर पत्नीवियोगाच्या दुःखाबरोबरही वचनपूर्तीचे समाधान मला लाभले. ◆






**श्री. कौस्तुभ नागेश मराठे**
(पृ. ५४१)

कै. नारायण विश्वनाथ मराठे व कै. लक्ष्मीबाई नारायण मराठे मु.पो. पाळी, ता. डिचोली, गोवा यांचा नातू व श्री. नागेश मराठे यांचे सुपुत्र कौस्तुभ नागेश मराठे, पुणे (शैक्षणिक अहर्ता, B.com, LL.M. A.C.S., Diploma-in-Intellectual Property Rights & Diploma-in-Acquisition & Merger of Companies) यांची नुकतीच महाराष्ट्र शासनाने दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी या पदावर ठाणे जिल्हात नेमणूक केली आहे. वरील पदावर नियुक्ती होणेपूर्वी ते मुंबई उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात वकीली करीत होते. वकीली करीत असतानाच काही काळ त्यांनी मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयात शिकविण्याचे काम केले. त्यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल त्यांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा मनःपूर्वक अभिनंदन व उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा!

श्री नागेश मराठे हे पुणे जिल्हा न्यायालयात ३२ वर्षे वकीली करीत आहेत. तोच वारसा त्यांचे चिरंजीव चालवीत आहेत.

# आनंदाश्रू

• श्रीराम मराठे, पुणे (पृष्ठ ४३) भ्रमणध्वनी : ९६९५७९९८८३४



**ख**रंच, आईचं बाबांना टोचून बोलणं त्यादिवशी मला असह्य झालं. रोजच्या सारखी मी कॉलेजमधून घरी आले. स्कूटर पार्क करून घरांत शिरले. त्यावेळी दोघांचं भांडण सुरू होतं. आई बाबांना खूप टोचून बोलत होती. मी मुद्दाम जाणीव दिली नाही. हॉलमध्ये बसून राहिले. ''तुमची प्रत्येक गोष्ट मलाच करावी लागते. आणखी किती वर्षे मी हे करायचं हो? मला मौज मजा सोसायटीमधल्या बायकांबरोबर करायलाच मिळत नाही. माझा नर्सचा जॉब, सर्विस नाही. पण फोनकॉल आला की जावं लागतं, बहुधा रात्रपाळी. दीपाविषयी काही तक्रार नाही. पण तिचं कॉलेज असतं. तुम्हाला एकट्याला सोडून जाता येत नाही. कारण पॅरॅलिसिसमुळे तुम्ही दरवाजा उघडायला पटकन उठू शकत नाही. तरी बरं, कामवाली, मी व दीपासाठी स्वतंत्र किल्ल्यांचे सेट करून दिलेत. फोन, मोबाईल तर तुमच्या शेजारीच असतो. पण तुम्हाला एकट्याला सोडून जास्त वेळ जाता येत नाही. माहेरीतर कित्येक महिने गेले नाही. दीपा गुणी आहे म्हणून ती घरी थांबते व थोडावेळ शॉपिंग, इतर बँकांची कामे मी करू शकते हे खरं आहे. पण मला बाई या सगळ्याचा कंटाळा आलाय. तुम्हाला काय, सगळं फुकट मिळतंय!''

''आई, तुझं बाबांना बोलणं मला मुळीच सहन होत नाही.'' मी मध्येच आत आले. ''आणि काय गं? बाबांनी अपार कष्ट करून हे सगळं प्रामाणिकपणे कमावलय नां? त्याचं पुरेसं व्याज दरमहा आपल्याला मिळतय ना? आता त्यांना पॅरॅलिसिसचा झटका आला हा काय त्यांचा दोष आहे? अगं आई तुझ्या नर्सिंग जॉब मधून असा किती पैसा मिळतो गं? माझं शिक्षण आता आणखी दोन वर्षे चालेल. मग मी ही अर्थार्जन करायला लागेन. माझ्या लग्नाचे पैसे मी मिळवीन, अगं बाबांवर तुझं खूप प्रेम आहे हे मला माहित आहे. तूं त्यांच्यावर खूप रागावतेस त्याबद्दल तुला नंतर पश्चात्ताप होतो हे ही मला माहित आहे. बाबा खूप मोठ्या मनाचे व सहनशील आहेत म्हणून त्यांचा बी.पी. वाढत नाही.''

हे माझं बोलणं आईनं सर्व ऐकून घेतलं. बाबाही ऐकत होते. त्यांनी मला प्रेमभरानं जवळ घेतलं डोळे पाण्यानं भरून आले होते. ते म्हणाले, ''दीपा, तू आईला हे सर्व बोललीस ते माझ्यावरच्या प्रेमानं. पण दीपा, तुझ्या आईला कितीतरी जास्त दिवस मी ओळखतो. आमचा प्रेमविवाह आहे. मी कॉलेजमध्ये असताना आमचं प्रेम जुळलं. कौटुंबिक कारणांमुळे मी एकटाच राहत होतो पुण्यात. लग्नानंतर तिनं नर्सिंगचा कोर्स केला. त्या कामातल्या अनियमीत वेळांमुळे तिला घराकडे पूर्णवेळ लक्ष देता येत नसे. पण तूं खरंच गुणी! कॉलेजमध्ये पहिला दुसरा नंबर तू कधी सोडला नाहीस. तुझं C.A.चं शिक्षण पूर्ण होत आलंय. त्यानंतर तू स्वतंत्र व्यवसाय करशील. त्यासाठी लागणारी ऑफीसची लहानशी जागा आपण आधीच घेऊन ठेवलीय. तुझी एक मैत्रीण तुझी पार्टनर व्हायला उत्सुक आहे. तिच्या वडिलांमार्फत काही क्लायंट्स पटकन मिळतील पण त्या व्यवसायातून मिळालेला तुझा पैसा घरात वापरायची काही गरज नाही. ते सर्व आपल्या बचतीतून होईल.

''बरं, अस्मिता मला बोलते ते केवळ प्रेमातून. ती श्रीमंत घरातली मुलगी. आंध्रातल्या जमिनदाराची मुलगी. पण मला पॅरॅलिसिसचा अ‍ॅटॅक आला व वाईट दिवस आले. माझ्या ऑफीसकडून काही पैसे मिळाले. पण ते पैसे किती दिवस पुरणार? हँडिकॅप्ड म्हणून थोडीशी पेन्शन मंजूर झाली पण ती पुष्कळशी माझ्या फिजिओथेरपी व औषधांवरच खर्च होते.''

''बचतीवरील व्याजावर व अस्मिताच्या नर्सिंगच्या मिळकतीवर हा सर्व डोलारा व तुझं शिक्षण सुरू आहे. केंद्रशासनाच्या एका योजनेखाली मला लवकरच नोकरी मिळेल बैठ्या कामाची, मंजूर झाली आहे. ती सुरू झाली की, ती ही मिळकत सुरू होईल.''

''अस्मिता, तू थोडा धीर धर. तुझे वडीलही दीपाच्या लग्नासाठी मदत करणारच आहेत. त्यानंतर आपला संसार सुखाचा होईल.'' असं म्हणून बाबांनी आईला प्रेमाने थोपटलं. ते बघून माझ्या व आईच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. ◆

### सुविचार

आपल्या प्रामाणिकपणाचाही उपयोग होईल, पण केव्हां?
तर दुसऱ्यास प्रामाणिक बनविण्याइतका आपला
प्रामाणिकपणा बलवान असेल तेव्हांच!

# मी लेखक कसा झालो

• श्री. वि.म. मराठे (पृ. २३५), सांगली भ्रमणध्वनी – ९४२०६७८९६५

**का**ही दिवसापूर्वी माझ्या कपाटाची आवरा आवर करताना अचानक माझ्या प्रसिद्ध झालेल्या पहिल्या कथेचे हस्तलिखीत सापडले आणि मला काय आनंद झाला त्याचे वर्णन करता येत नाही. आई वडीलाना आपल्या मुलाचा जन्म आठवताना जो आनंद होत असतो त्या प्रमाणे माझ्या पहिल्या कथेचे हस्तलिखीत बघितल्यावर मला झाला. माझी ती कथा होती ''पेन्शनचा फोटो'' निवृत्ती नंतर माझी लिहलेली व प्रसिद्ध झालेली ती कथा दै. सकाळच्या रविवार पुरवणीत ७ मार्च ९३ रोजी प्रसिद्ध झाली होती. आपल्या पहिल्या मुलाची बातमी ज्या आनंदाने आपल्या नातेवाईकांकडे व इतर मित्रांकडे कळवतो त्याप्रमाणे या कथेच्या झेरॉक्स प्रती मी सगळीकडे पाठवल्या.

मार्च ९३च्या पहिल्या कथेनंतर माझ्या २९ कथा प्रसिद्ध झाल्या व त्यांचे दोन कथा संग्रह मी प्रसिद्ध केले. मी या कथा कसा लिहित गेलो याचा इतिहास बघत मी मागे गेलो ते अगदी १९५७ सालात.

त्या वेळी मी मुळा धरणाच्या जागेवर मुळा नगर येथे राहत होतो. तेथे अगदी थोडी वर्तमान पत्रे येत असत. ''सकाळचे स्वराज्य'' नावाचे साप्ताहिक वाचायला मिळत असे. त्या मध्ये घडलेले विनोद, केवळ विनोद व व्यंग चित्रे प्रसिद्ध होत. माझे मित्र प्रा.भास्कर दिवेकर त्या मध्ये अशा प्रकारचे विनोद पाठवून प्रसिद्धी मिळवत असत. मोबदला १ रु. व अंक येत असे. मोबदला महत्त्वाचा नव्हता पण आपले नांव प्रसिद्ध होते याचा आनंद मोठा असे. मी पण विचार केला की आपणही असा प्रयत्न करावा. घडलेले विनोद काही खरे असतात असे नाही. मनात एकादा विनोद सुचला तर तर तो नीट लिहून पाठवायला सुरुवात केली व ते प्रसिद्ध होऊ लागले. मला थोडे कानडी शब्द माहीत होते, त्याचा अर्थ मराठीत वेगळा असे. त्या वरून विनोद लिहीता येऊ लागले. उदा. कानडीत मडी म्हणजे सोवळे आणि मडीचा मराठीत अर्थ प्रेत हा तुम्हाला माहीत आहेच. एक कानडी महिला शेजारी सोवळे मागायास जाते ती त्या घरात मडी मडी म्हणून प्रवेश करताच भरल्या घरात ही मडी मडी का म्हणते याचा राग येऊन थोडी भांडणे होतात. कुंडी याचा अर्थ कानडीत पार्श्व भाग असा आहे. मराठीत झाडांची कुंडी.! घर मालक बागेतील कामगार बाईस कुंडी हलव असे सांगणार होता तेवढ्यात दुसरा तसे म्हणू नका असे सांगतो व तसे सांगतिले असते तर काय झाले असते तेही सांगतो.. असे बरेच विनोद तयार करता येत होते. थोडक्यात माझ्या लिखाणाची सुरुवात विनोद लिहण्यापासून झाली असे म्हणावे लागेल. त्याच प्रकारे काही विनोदी चित्रांच्या कल्पनाही मी पाठवल्या व त्यावर चित्रे प्रसिद्ध झाली.

मनातील विचार कागदावर उतरवण्यास कागद पेन जवळ ठेवावे, विचार कागदावर लिहीत असतानाच आपोआप ते नीट लिहले जातात अगर आणखी काही गोष्टी उतरवता येतात. आपले सार्वजनीक जीवनातील विचार व्यक्त करण्यासाठी वर्तमान पत्रातील वाचकांचा पत्रव्यवहार हे सदर उपयोगी पडते. आपले विचार मुद्देसुद व थोडक्यात मांडायची सवय त्यामुळे होते. ते तसे लिहले गेले तर प्रसिद्ध होण्यास अडचण येत नाही. २००० सालच्या सुमारास दै 'सकाळ' महिन्यातील तीन उत्कृष्ट पत्राना बक्षिसे देत असे. मलाही अनेक वेळी पहिले बक्षीस मिळाले आहे. या प्रोत्साहनाने मला विचार शब्दबद्ध करण्याची सवय लागली.

मी १९९२ साली निवृत्त झालो. त्याकाळी त्यासाठी पेन्शन पेपर बरोबर नवरा बायकोचे एकत्र फोटो लागत होते. लग्न झाल्यापासून कधीही असा एकत्र फोटो काढलेला नसतो अशा वेळी बायकोच्या मनात काय काय विचार येत असतील व फोटो स्टुडीओत काय होऊ शकते याचा विचार करत मी : पेन्शनचा फोटो : ही कथा लिहली. तीत अनेक विनोदी प्रसंग घातले. बायको प्रथम इतके दिवसात कधी फोटो काढला नाहीत आता मी येणार नाही असे आढेवेढे घेते. शेवटी फंडाची रक्कम, ग्रॅच्युयटीची रक्कम इ.चा आकडा ऐकून ती फोटो काढून घेण्यास तयार होते. कथेत फोटो ग्राफरने त्याना एकमेकाजवळ ढकलणे, केसावरून हात फिरवा म्हंणल्यावर अनवधानाने टकलावरून हात फिरवणे हसरा चेहरा येण्यासाठी चीज म्हणणे, फोटोच्या निगेटीव्ह वरुन पाठमोऱ्या व्यक्तीचा समोरून फोटो काढण्याची कल्पना इ. विनोदी प्रसंग असल्याने कथा विनोदी झाली व ती प्रसिद्ध झाली अशी हा माझ्या पहिल्या कथेची गोष्ट.!

अशी माझी पहिली कथा प्रसिद्ध झाल्यावर काही दिवसात उतम कथा मासिकाची वार्षिक कथा स्पर्धा जाहीर झाली. अभियंता वर्गाबद्दल समाजात वाईट समज होता. पैसे खातात इ. मला हे खोडून काढायचे होते. मी तीन वर्षे जि.प.मधे काम केले होते. मागास वर्गीयांसाठी शासनाने : जीवन धारा : ही विहिरींची योजना जाहीर केली होती. ती मध्ये आपल्याच शेतात शेतकरी विहीर खोदू शकत होता व त्या बद्दल त्यास रक्कम मिळणार असते. ही विहीर मंजूर करून घेण्यासाठी त्याला कायकाय करावे लागते व

मंजूर झाल्यावर तीचे खोदकाम करताना काय अडचणी येतात हे सांगितले आहे, पुढाऱ्याला मंजूर झालेल्या रकमेतून वाचलेले पैसे मिळण्यासाठी त्याला ओव्हरसियरवर खोटी तक्रार करण्यास सांगितले जाते. विहीर पूर्ण होते. मनात खोटी तक्रार केली हे त्याला मनात सारखे डाचतच असते. जिल्हाधिकाऱ्यांकडून त्याचा सत्कार होताना त्याला रहावत नाही व आपण खोटी तक्रार केली व मोठे पाप केले असे सांगून पाप क्षालनासाठी तो विहीरीत उडी मारतो. अशी ही कथा मनाला चटका लावून जाते व त्या कथेस स्पर्धेत पहिले बक्षीस मिळते..

माझी दुसरी कथा मृगजळ. उन्हाळ्यात खेडोपाडी पाण्याचे दुर्भिक्ष असते. त्या साठी शासनातर्फे पाण्याचे टँकर पाठवले जाण्याची व्यवस्था असते. पण शासकीय कामातील सावळ्या गोंधळामुळे टँकर वेळेवर जात नाहीत व लोकांचे हाल होतच राहतात. कधी एकदा टँकर येईल याची लोक वाट बघत असतात. असेच एके दिवशी टँकर आलेला बघून सुताराचा पोरगा पळत जातो व टँकर खाली सापडतो. अशा या अपघाताची ही कथा मी प्रत्यक्ष अनुभवली आहे. आणि अशी ही परिस्थीती असताना शासनाने अधिकारी दुसऱ्या स्कीमचे उद्घाटन करत असतात. मालतीबाईंनी म्हणल्या प्रमाणे लेखकाला आजूबाजूच्या परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करता आले पाहिजे. ही घटना बघितलेली असल्याने कथा परिणामकारक झाली आहे. त्यावेळी झालेले पंचनामे त्यात टायर मार्क इ. नोंदणे हे नेहमीचे असते, व त्याचा उल्लेख कॅ. सुरेशने त्याच्या खालील अभिप्रायात केला आहे. ''मृगजळ ही कथा छान जमली आहे. वाचायला घेतल्यावर वाचत रहावे वाटते. विशेषतः तुझे observation त्यात उत्तम तऱ्हेने प्रकट झाले आहे. हायवेवर होणारे अपघात तर तू जाताजाता menstion केले आहेस पण अपघातानंतर चौकशी कशी करतात ते टायर मार्क वगैरेही सांगून गेला आहेस,. तुझी गोष्ट मनाला चटका लावून जातेच पण बरीच माहितीही सांगून जाते.''

कथा लिहण्याची अशी सुरुवात झाल्यावर एके दिवशी विश्रामबाग येथे एका अपार्टमेंट मध्ये चोर पकडला जातो. पकडणारे दोघे नवराबायको ज्येष्ठ असतात. असे असताना चोर कसा पकडला असेल याची कल्पना करत मी कथा लिहिली त्यात सर्व ठिकाणी आढळणारी पद्धत म्हणजे गस्त घालणे इ. मधून विनोद दाखवले आहेतच पण शेवटी चोर आल्यावर म्हातारा हातातील चादर घेऊन कॉटवर उभा राहतो, तो घाबरल्यामुळे कॉट हलू लागते व म्हातारा, हातातील चादरीसकट चोराच्या अंगावर पडतो व चोर पकडला जातो, असे हे वर्णन डोळ्यापुढे आणून बघा व बघा तुम्हाला हसू आल्याशिवाय राहणार लोकांच्या उपयोगी पडणारा शेजारी असला तर काहीजण त्याचा गैरफायदा घेतात. अशीच एका शेजाऱ्याचा गैरफायदा घेणाऱ्या शेजाऱ्यास कधी अद्दल घडवली जाते याची तोडगा ही विनोदी कथा आकाशवाणी वरून प्रक्षेपीत झाली.

समाजात नेहमी बघायला मिळणारे रस्ता रोखो, बंद, मोर्चे इ. मुळे सामान्य लोकाना काय त्रास सहन करावा लागतो याची कल्पना मोर्चेकऱ्याना नसते. तसाच एक बंद साखर कारखान्यात होतो व त्या पुढाऱ्यालाच त्याचा फटका बसतो हे दाखवणारी माझी बूमरँग ही कथा! याच नावाने माझा तेरा कथांचा दुसरा कथा संग्रह मी २०१३ साली प्रसिद्ध केला. यामध्ये काही विनोदी तर काही सामाजिक कथा आहेत. विनोदी कथांमध्ये गुंगारा ही कथा एका पाटबंधारे वसाहतीत घडलेली सत्य कथा आहे. एका इसमाने करमणुकीचा कार्यक्रम करतो म्हणून सबंध कॉलनीस कसा गुंगारा दिला अशी ही कथा आहे. मी नगरला राहत असताना खोलीच्या कुलपाची किल्ली हरवली होती. त्या वेळी किल्ली करणाऱ्या माणसाने अंधारात कुलूप चाचपून किल्ली करून दिली होती. हा अनुभव मला ''तेथे पाहिजे जातीचे'' ही कथा लिहताना मी वापरला व संकष्टी दिवशी माझ्या मित्रावर किल्ली करून घेण्याचा प्रसंग आला त्यावर ही विनोदी कथा लिहली. अशाच आणखी काही विनोदी कथा लिहल्या.

माझ्या कथांचे परीक्षण करताना आमच्या मार्गदर्शक कै. प्रा मालतिबाई किर्लोस्कर यानी पुढील अभिप्राय लिहीला आहे, ''आपले कथा लेखन मला आवडले. लेखकाजवळ अवती भोवतीच्या जीवनाचे सूक्ष्म अवलोकन करता यावे लागते. ते नेमक्या शब्दात व प्रत्ययकारी भाषेत उत्कटपणे वाचकांपुढे उभे करता यावे लागते. लहान मोठ्या व्यक्तींच्या जीवनात येणाऱ्या दुःखाबद्दल एक सहज अशी करूणाबुद्धी त्याच्याजवळ असावी लागते. त्याच्या कथाविषयांचा परीघ मर्यादीत असो अगर विस्तृत असो जे लिहतो ते वाचकांच्या मनाला भिडावे लागते. तो दुःखांचा डोंगर असो की हसून हसून मुरकुंडी वळवणारा खेळकर अनुभव असो. आपल्या लेखनात असे कितीतरी विषय मला जाणवले म्हणून लेखनाबद्दल आपले मनापासून अभिनंदन करते पुढील वाटचालीस शुभेच्छा–''

मला आलेले निरनिराळे अनुभव मला कथा लिहताना उपयोगी पडले. अशा रीतीने २९ कथा मी लिहल्या. त्या चांगल्या मसिकात प्रसिद्ध झाल्या व बहुतेकाना दिवाळी अंकात स्थान मिळाले.

माझ्या कथा प्रसिद्ध व्यंग चित्रकार, अभियंता श्री. विवेक मेहेत्रे याना पसंत पडल्या व त्यानी माझा जीवनधारा हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध केला. त्यांनतर दर वर्षीच्या त्यांच्या ऑल दि बेस्ट, इ. दिवाळी अंकात माझ्या कथा प्रसिद्ध होत आहेत.

माझ्या कथा लेखनाचा इतिहास घडत असताना मला प्रासिद्ध लेखिका (कै.) मालतिबाई किर्लोस्कर, मित्र कॅ. दिवेकर, प्रा. भास्कर दिवेकर माझे कुटुंबीय व अनेक मित्रानी प्रोत्साहन दिले.

◆

# श्री. मोहनराव मराठे यांनी सत्कारप्रसंगी केलेले भाषण

• श्री. मोहनराव मराठे (पृ. ३६५), खार

रविवार दि. ९ सप्टें. २०१८ मराठी प्रतिष्ठानाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केलेले भाषण –

डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन पुणे ही साखर धंद्यात काम करणाऱ्या तंत्रज्ञांची (शेती, इंजिनियरिंग केमिस्ट्री टेक्नॉलॉजी, जोडपदार्थ व व्यवस्थापन) ह्यांची महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, आंध्रप्रदेश ह्यांची संस्था आहे. ह्यांच्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेने २००९ मध्ये मला डॉ. ए.पी.जे कलाम ह्यांच्या हस्ते साखर उद्योगाच्या सामाजिक कार्यामधील कामाबद्दल जीवन गौरव पुरस्कार दिला होता. आता सेवानिवृत्त झाल्यावर १८ वर्षांनी मला DSTA ने व्यवस्थापन तज्ज्ञ Management Expert म्हणून नुकताच जीवनगौरव पुरस्कार दिला. आपल्या प्रतिष्ठानचा आजचा गौरव हा घरातला म्हणजे जास्त आपुलकीचा आहे. त्याबद्दल मी आपले आभार मानतो व ह्या निमित्ताने माझे विचार उत्तरादाखल आपल्या समोर ठेवत आहे.

मी रिझर्व बँकेत ५ वर्षे व राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशन मध्ये कनिष्ठ पदावर काम केले. साखर कारखाना संघ महाराष्ट्रामध्ये सेक्रेटरी म्हणून २१ वर्षे काम केले व १९७१ पासून कार्यकारी संचालक म्हणून महाराष्ट्रात १७ वर्षे व देशपातळीवर दिल्लीला १३॥ वर्षे काम केले.

सेवानिवृत्तीनंतर १८ वर्षांनी व्यवस्थापन तज्ज्ञ म्हणून पुरस्कार मिळाल्यावर मी प्रथम अंतर्मुख झालो. CEO म्हणून आज आपण अनेकांचे कर्तृत्त्व प्रसार माध्यमातून पाहतो, ऐकतो, वाचतो. मी तसे काय केले आहे? स्वभावाने नेमस्त प्रवृत्तीचा, Low Profile ठेवणारा मी कसा काय व्यवस्थापन तज्ज्ञ?

दोन अनुभव सांगतो DSTA चे अध्यक्ष श्री मानसिंगराव जाधव त्यावेळी वारणा सहकारी साखर कारखान्यात चीफ केमिस्ट होते. त्यांनी कार्यकारी संचालक पदासाठी साखर संघाकडे अर्ज केला. निवडीसाठी साखर संघ चेअरमन महाराष्ट्र सरकारचे साखर संचालक व मी अशी समिती होती. मी त्यांना एकच प्रश्न विचारला. कार्यकारी संचालक झाल्यावर त्यांना चीफ केमिस्टपेक्षा खूप कमी पगार मिळणार होता. तरी त्यांना कार्यकारी संचालक का व्हायचे आहे? त्यांनी उत्तर दिले. चीफ कमिस्ट म्हणून साखर कारखान्यात मला ज्या सुधारणा कराव्या वाटतात त्या मी कार्यकारी संचालक MD झालो तरच करू शकेन. मानसिंगरावांची निवड तर झालीच पण त्या कामात त्यांनी आदर्श कामगिरी केली DSTAच्या ७५ वर्षाच्या इतिहासात आजपर्यंत अध्यक्षपद खासगी साखर करखान्यांचे मालक व सहकारी साखर कारखान्यांचे अध्यक्ष ह्यांनी भूषविले. कार्यकारी संचालकांमधून मानसिंगराव पाहिले अध्यक्ष. माझ्या गौरवाला मानसिंगरावाना एक श्रेय देतो.

दुसरा अनुभव माझे एक चेअरमन श्री तात्यासाहेब कोरे वारणानगर ह्यांचा. ते म्हणत की सहकारी क्षेत्रात पदाधिकारी व अधिकारी दोघेही कार्यकर्ते आहेत. पदाधिकारी बिनपगारी कार्यकर्ते व अधिकारी पगारी कार्यकर्ते! माझ्या कामात मी पगारी कार्यकर्ता ही भूमिका ठेवली व त्या निष्ठेने काम केले.

माझ्या कामात मला वसंतदादा पाटील ते शरद पवार, मध्ये अनेक चेअरमन ह्यांचे मार्गदर्शन झाले माझ्या यशात ह्यांचा वाटा ५० टक्के व बाकी ५० टक्के वाटा फक्त सौ. स्वाती मराठेंचा.

कार्यकारी संचालक म्हणून काम करताना विशिष्ट सामाजिक परिस्थितीचाही उल्लेख केला पाहिजे. सहकारी साखर कारखानदारी ग्रामीण बहुजन शेतकरी नेत्यांच्या हातात होती. देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत सर्वस्व देणाऱ्या नेत्यांना राजकीय स्वातंत्र्यानंतर आर्थिक स्वातंत्र्याची निकड भासली. सार्वत्रिक मतदानावर आधारित राजकीय सत्ता व मताधिष्ठित सहकारी अर्थव्यवस्था ह्यांच्या मिलाफातून सहकारी साखर कारखानदारी फोफावली व तिला जगाच्या शेतीआधारित उद्योग क्षेत्रात तुल्यबळ दुसरे उदाहरण नाही. महाराष्ट्रात आपल्याकडे चातुर्वर्णातील मराठी वैश्य जात आहे का? जागतिक मराठी संमेलनात शिवाजीराव गिरधर पाटील ह्यांचा गौरव करताना मुख्यमंत्री मनोहरपंत जोशी ह्यांनी महाराष्ट्रातील साखर हा मराठी माणसाच्या हातातील एकमेव उद्योग असा गौरवपूर्ण उल्लेख केला होता.

मी ज्या जातीतून आलो त्याबद्दल पदाधिकारी (राजकीय व सहकारी) ह्यांच्या मनात अव्यक्त सामाजिक ग्रह होते. पण मला त्यात अजिबात आश्चर्य वाटले नाही. आमची घरची शेती होती. गाईम्हशींच्या शेणामुताच्या वासात मी वाढलो. रिझर्व बँकेच्या १९६१-६२ ह्या दोन वर्षातील ग्रामीण आर्थिक पाहणीमध्ये मला महाराष्ट्रातील ३२ खेड्यांमधील शेतकरीमजूर

ह्यांची परिस्थिती जवळून पाहण्याचा योग आला व आपल्या सामाजिक व्यवस्थेत अस्पृश्य, महिला ह्यांच्या बरोबरीने शेतकरी हा वंचित समुह आहे असे माझे मत झाले. विचारांची अशी सांगड जमल्यावर पदाधिकाऱ्यांशी माझे विश्वासाचे संबंध जुळले. मी पुढे पुढे करायचो नाही. राजकारणाची माहिती घ्यायची पण पडायचे नाही. माणसे जोडायची, अंतर वाढवायचे नाही. त्यामुळे मी ९-१० चेअरमनच्या हाताखाली यशस्वीरीत्या काम करू शकलो. अनेकांना ह्याचे आश्चर्य वाटते. त्याचे रहस्य हे आहे व त्याचे मोठे श्रेय पदाधिकाऱ्यांनाही आहे.

देशपातळीवर काम करताना मी २ गोष्टी केल्या. १) साखरधंद्यात सहकारी व खाजगी अशा २ प्रबळ शिखर संस्था होत्या. त्यांच्यामध्ये विस्तव जात नव्हता. मी पाहिले की ऊसाच्या किंमतीखेरीज इतर सर्व प्रश्नावर त्यांच्यात एकमत होते. तेव्हा ऊसाच्या किंमतीवर Agree to Disagree धोरण व इतर सर्व प्रश्नांवर भारत सरकार व त्यांच्या संस्थाकडे आम्हा दोन्ही संस्थांची Joint Lettar Head वर एकच पत्र जात असे. साखर किंमत, निर्यात, कामगार प्रश्न, कायदेशीर लढाई इ. प्रश्नांवर आम्ही एकत्र लढून यश संपादन केले.

२) खाजगी कारखान्यांची दिल्लीतील कामे करण्यासाठी प्रत्येकाचे स्वतंत्र संपर्क अधिकारी असत. त्यांच्या शिखर संस्थेकडे ते मोजक्या कामासाठी जात. देशातील २५० सहकारी साखर कारखान्यांकडे अशी व्यवस्था शक्य नव्हती व त्याला परवानगीही नव्हती. अशा वेळी माझे ऑफिस हे त्यांचे दिल्ली ऑफीस असे समजून मी त्यांची कामे फेडरेशन स्टाफकडून करवली. सहकारी साखर कारखान्याचा गोडाऊन क्लार्क, ज्यु. अकाऊंटंट कारखान्याचे दिल्लीतील काम यशस्वी करून परत जायचा. माझ्या कामाबद्दल सर्वांना आदर वाटायला लागला. मुंबईमध्ये महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची मंत्रालयातील कामे अशाच पद्धतीने केली जात.

नॅशनल फेडरेशनमध्ये मी महाराष्ट्र संघातून प्रतिसेवेवर Deputation वर गेले होते. तेथे माझ्या हाताखाली काम करणारे ८-१० जण माझ्यापेक्षा जास्त पगार घेत. पण मानसिंगरावच्या उदाहरणावरून मला त्यात कमीपणा वाटला नाही. महाराष्ट्र संघातील निवृत्तीचे माझे ६० वय पूर्ण झाल्यावर मला थेट सेवेत संचालक मंडळाने मला माझ्या वरिष्ठ तांत्रिक अधिकाऱ्यांचा पगार मंजूर केला. तो भारत सरकारचा सर्वोच्च अधिकारी कॅबिनेट सेक्रेटरी ह्याच्या पगाराइतका होता. तो मी तीन-साडेतीन वर्षे घेतला.

मुंबईत माझे अडीच वर्षे बॉस असलेले MD श्री नायडूसाहेब माझे गुरू. त्यांनी मला असा गुरुमंत्र दिला की संघात यशस्वी व्हायचे तर ऊस उत्पादकांना ऊसासाठी जास्तीत जास्त दर मिळवण्याचा प्रयत्न करावयाचा दिल्लीत MD NS Jain माझे त्यांच्या अखेरपर्यंत गुरु होते. ह्याशिवाय वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचे मला कायम प्रोत्साहन मिळाले.

आपण सर्वांचे पुन्हा एकदा कृतज्ञापूर्वक आभार.

◆

# वाचकांचा पत्रव्यवहार

दि. १८-१०-१८

प्रति,

**डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**

संपादिका, हितगुज त्रैमासिक,

८/१३ सहकारनगर, वडाळा, मुंबई-३१

महोदया,

१) मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. रमाकांत विद्वांस यांचे संबंधी

आजच शोकदायक बातमी समजली अत्यंत वाईट वाटले. माझा आणि त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला नाही. तरीही, हितगुजमधील माझे बंदी विषयींचे लेखांबाबत त्यांचे मला २४ वेळा फोन आले होते. ते म्हणाले चक्रदेव तुमचे लेख मला आवडतात. ते एकत्र करून त्याचे संकलन करून एखादे छोटे खानी पुस्तक जरूर तयार करावे, प्रतिष्ठान त्या दृष्टीने जरुर मदत करेल. आतां पुस्तकांची तयारी जवळ, जवळ, ९० टक्के झाली आहे. महिना, दोन महिन्यांत पुस्तक प्रसिद्ध ही होईल. हेसर्व खरेच आहे. पण-रमाकांत विद्वांसांचे काय?

आपलाच

**अच्युत म. चक्रदेव** (पृ.७३२)

निवृत्त अधिक्षक महाराष्ट्र कारागृह विभाग.

पत्ताः द्वारा हेरंब अ.चक्रदेव,

ओरिएंटल हेरिटेज सोसायटी,

सदनिका क्र.१५ माणिक कॉलनी

चिंचवड-पुणे- ३३

**टीप** : कालच समजले की, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. आदित्यनाथ योगिजी यांनी अधिकृत रित्या अलाहाबादचे नांव प्रयागराज असे सर्वानुमते ठेवले आहे.

आपल्या संकलनात्मक 'सद्गुण विकृती' संदर्भात
आतां बाकीची 'बाद' शहरे बाद कधी होणार!

# बंदी मदन कुलकर्णी

• अच्युत म. चक्रदेव, पुणे (पृ. ७३२)

बंदी मदन कुलकर्णी माझ्या नोकरीच्या जवळजवळ उत्तर काळांत भेटला. अनेक प्रश्नचिन्ह चेहेऱ्यावर ठेवून तो मला त्या काळी भेटला होता. भेटताच त्याने मला नमस्कार करून त्याची ओळख करून दिली. तो खूपच बोलका म्हणण्यापेक्षा बडबड्या होता. प्रचंड बोलका स्वभाव हे त्याचे स्वतंत्र वैशिष्ट्य होते. पहिल्याच भेटीत त्याने मला सांगितले, ''साहेब, माझे शिक्षण एस.एस. सी.पर्यंत झाले आहे. पण एवढ्यावर मी संतुष्ट नाही. मला अजून खूप शिकायचे आहे. मी म्हटले, ''तूं शिकू शकतोस. तुझी इच्छा आहे नां, मग झाले तर! मी व माझे स्नेही श्री. वाडीकर, आम्ही तुला नक्कीच मदत करूं।'' यावर समाधानाने त्याने मान हलवली. त्याने इच्छा दर्शविली म्हणून मी त्याला कैदी कारकूनाचे काम दिले. कारागृहात अनेक ठिकाणी कारकूनाची गरज लागते. दैनंदिन प्रत्येक कामात म्हणजेच बंदीचे 'जेवण' इ. विषयक कामात तसेच प्रवेश व मुक्तता विषयक कामात अनेक ठिकाणी हिशेब ठेवावा लागतोच. अशाच एका कामासाठी हिशेब ठेवण्यासाठी मदन कुलकर्णी याची नेमणूक झाली. प्रथम नमूद केल्याप्रमाणे बंदीचे महाविद्यालयीन शिक्षणासाठी प्रथम वर्षाला बसण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे अर्ज केला. त्याला रीतसर परवानगी मिळाली. बंदी पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या 'नवजीवन मंडळाकडून त्याला पुस्तके, वह्या इ.ची मदत झाली.' विशेष बंदोबस्तांत मदनची परीक्षा झाली. तो ती चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाला. आपलें नित्याचें काम सांभाळून त्याने रात्री जागून अभ्यास केला. हाच क्रम पुढे चालवून, भरपूर अभ्यास करून मदनने कला शाखेची पदवी संपादन केली. अनेक अडचणींना तोंड देवून, त्याने अभ्यास केला होता. ज्या बंदींना कायदेविषयक अडचणी येतात. त्यांचे पाठीशी उभे राहून त्यांचे प्रकरणांत त्यांना भरपूर मदत करणे हे त्याचे ध्येय ठरवून त्याने बाहेरून कायद्याची पदवीही मिळविली. वकीली करावयाची तर सनद मिळविली पाहिजे. नवजीवन मंडळाकडे सांगून त्याने सनदही मिळविली. कार्यालयाचे कामांत पूर्ण मदत करून ते यशस्वीपणे पूर्ण करून त्याने शिक्षेत माफीही चांगली मिळविली व शिक्षेची सोळा वर्षे निव्वळ शिक्षा भोगून तो मुक्त झाला. त्याने ठरविल्याप्रमाणे सत्र न्यायालयात जावून तेथे सनद सादर करून न्यायालयात त्याने काही बंदींची प्रकरणे त्याने पूर्ण अभ्यासाने मार्गी लावली. कोणतेही शुल्क न घेता, त्याने मार्गाला लावली. ज्या बंदीची आर्थिक परिस्थिती उत्तम होती, त्यांचे कडूनही त्याने माफक शुल्क घेतले.

बंदी मदनचा नेमका काय गुन्हा घडला होता?

बंदी एका खाजगी कार्यालयात नोकरीला होता. तेथेच एक सुशील स्त्री त्याच्या सारखीच प्रचंड बोलक्या स्वभावाची, तेथे कामाला लागली. ती बंदीशी खूपच मोकळेपणाने बोलत असे. याचा अर्थ बंदीने ती त्याचेवर मनापासून प्रेम करते आहे असा घेतला व पुढे एके दिवशी त्याने तिला विवाहाबद्दल विचारणा केली ती खूपच चिडली आणि म्हणाली, ''माझ्या मोकळेपणाचा अर्थ तुम्ही भलताच घेतलात.'' माझे तुमचेवर प्रेम वगैरे काही नाही. आता यापुढे तुम्ही माझ्याशी बोलू नका.

बंदीने मनाशी खूप स्वप्ने ठरविली होती. त्याचा स्वप्नभंग झाला. तो रागाने बेभान झाला व त्याने जवळच एक कागद कापायची सूरी होती, ती त्याने तिचे पोटांत खूपसली.

आता पेपर कापण्याची सूरी ती काय? पण आपले पोटात काहीतरी खुपसले गेले आहे या भीतीनेच ती अर्धमेली झाली रक्तस्त्राव फारसा झाला नाही. ती थरथर कापत होती. २४ तासांचे आत ती मृत्यु पावली. मदनला अटक केली गेली. सत्र न्यायालयाने त्याने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. बंदीचे ऐन तरूणपणांतच कर्तृत्व दाखवण्याचे वयातच हे घडले आणि बंदी कारगृहात आला.

मुक्तता झाल्यावरही मदनचा मला फोन येत असे. तो आला नाही, म्हणून मी चौकशी केली. फोन बहिणीने घेतला, ती बोलताना तिचा स्वर कापरा झाला होता.

त्या स्वरातच ती म्हणाली ''साहेब, २ महिन्यांपूर्वीच मदन किरकोळ आजाराने मृत्यु पावला.''

अशी ही बंदी मदनची कथा!

◆

**सुभाषित**

निर्विषेणापि सर्पेण फूत्कर्तव्यं विशेषतः<br>
विषं भूयात् न वा भूयातं।


दांती तुझ्या विष असो अथवा नसूदे<br>
फूत्कार तू करित जा, तरि सर्प मित्रा।<br>
(जो अैकुनी जन तुझ्या जवळी न येअी तूही सुरक्षित तशी<br>
जनताहि होअी।

(दत्तजयंतीच्या निमित्ताने)

# मौनी स्वामी यांची दत्तभक्ती

• डॉ. सौ. सुमेधा प्र.मराठे (पृ. १२०), वडाळा दूरध्वनी – ०२२–२४१५०८८९

मौनीस्वामी ऊर्फ नारो भिकाजी पारखी शके १७०४ ते १७९६ पेशवाई अखेरीस काळातील संतकवी होते. ते नाशिक जिल्ह्यांतील सिन्नर गावचे राहणारे असून दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत दप्तरदार होते, पुढे अव्वल इंग्रजी अमदानीत जामनेर येथे फडणीस म्हणून होते. त्याच सुमारास नाशिकचे प्रसिद्ध सत्पुरूष श्रीरघुनाथभटजी महाराज यांस ते शरण गेले आणि तेव्हापासून त्यांनी विसृक्ती व मौन पत्करले.



वयाच्या ६३व्या वर्षी त्यांनी दंडग्रहणपूर्वक संन्यास दीक्षा घेतली आणि 'नारायणेंद्र सरस्वतीस्वामी' हे चतुर्थाश्रमींचे नाव धारण केले.

मौनी स्वामी मोठे विद्वान होते. त्यांच्या नावावर 'लघुबोध', 'स्वात्मबोध', 'पंचीकरण' आणि 'समाधिप्रकरण' असे चार ओवीबद्ध वेदान्तपर ग्रंथ आहेत. त्यांची गोड पदरचनाही उपलब्ध आहे.

मौनींनी श्रीदत्तात्रेयांवर केलेली एक आरती उपलब्ध आहे ती अशी

''जय जय दत्त दिंगबर आत्रिऋषीपुत्र।
अनुसूया निजबालक म्हणावे सी जगामिला।
जगदुद्‌भवास्थीती प्रल्यां कारण आदिसूला।
ब्रह्म चिदंबर सुखरवेघ तूं सुखवक्ता।।१।।

जयदेव जयदेव जय दत्तात्रेया।
श्रीदत्तात्रेया भवहर वंदित सद्‌गुरुवर सदया।।ध्रु।।
भक्ति ज्ञानविरागास्तव हे सन्मूर्ती।
नरसिंहादिक म्हणाविसि अपणा सरस्वती।
यतिवर वेषा धरूनी रक्षिसी धर्मारिती।
दर्शन स्पर्शन बोधे पावन हे जगती।।२।।
विधिहरिशंकररूपा त्रिगुणात्मदीपा।
सच्चिन्मयसुखरूपा केवळ अरूपा।
स्थानालय देहलय तापलयकुणपा।
विरहित सर्व उपाधी निर्गतभवतापा।।३।।
अगणित प्रलयांबूसम चिद्घनरूप तुझे।
बुदबुदवत् जग सर्वहि जगदाभास सुजे।
त्रिवर्त सिद्धान्ती हे मृषाची सर्वदुजें।
अद्वैता करिं पावन निर्भय पादरजें।।४।।
अज्ञानांधसमुद्रा करिं शोषण भद्रा।
अनादि जीव कुनिद्रा पळविं तूं अमरेंद्रा।
निजजन चकोरचंद्रा अवगुण जडतंद्रा।
नाशय कुबुद्धि मौनी वंदित पदमुद्रा।।५।।

या आरतीवरून मौनी कविचा दत्तात्रेय हा अत्रि–अनुसूयेचा पुत्र असून, त्रिमूर्ती स्वरूपात उत्पत्ति–स्थिति–लय ही कार्ये करतो. भक्ति ज्ञान वैराग्याने युक्त असा दिगंबर दत्तात्रेय अज्ञानी जनांना दर्शनाने, स्मरणाने पावन करतो. यतिवेष धारण करून धर्माचे रक्षण करतो. मौनींचा दत्तात्रेय 'सद्‌गुरु स्वरूप मान्य पावलेला आहे. पुराणांतल्या दत्ताप्रमाणे त्याचे कार्य आहे.

मौनी कवीची ही दत्तात्रेयावरील आरती विचाराने आणि तत्त्वज्ञानाने परिपूर्ण आहे. 'ब्रह्मसत्यं जगत्मिथ्या' हे तत्त्व कवीला पटले असून चिन्मय ईश्वरांनेच जग निर्माण केले, काही काळ ही स्थिति कायम राहिली तरी अन्ती या जगाचा लय होणार आणि पुनश्च हे जग ईश्वरस्वरूपांत विलीन होणार हे पटवून देण्यासाठी कवि ''अगणित प्रलयांबूसम चिद्‌घन रूप तुझें। बुद्‌बुदवत् जग सर्वहि जगदाभास सुजें।।'' जलाशयात निर्माण होणाऱ्या काही काल आपले अस्तित्व राखून शेवटी जलमय होणाऱ्या बुडबुड्याप्रमाणे या जगाची स्थिती आहे असे उदाहरण कवि सहजपणे देऊन जातो.

देहात्मबुद्धीमुळे माणसाचा अंहकार आणि अज्ञान प्रबळ होते म्हणून तो जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकतो, परिणामी त्याला अनंत क्लेश भोगावे लागतात. अज्ञान, अवगुण, कुनिद्रा, कुबुद्धि इत्यादी दोषांचा नाश झाल्याशिवाय जीवाचा उधार होऊ शकत नाही आणि म्हणून मौनी कवी दत्ताच्या आरतीत शेवटी शरणागत

भाव आणून दत्ताला कळवळून विनंती करीत म्हणतातः

''अज्ञानांधसमुद्रा करी शोषण भद्रा।
अनादिजीव कुनिद्रा पळवि तूं अमरेंद्रा।।
निजजन-चकोरचंद्रा अवगुण जडतंद्रा।
नाशय कुबुद्धि मौनी वंदित पद्मुद्रा।''

महाराष्ट्रीय संतकवि-काव्य-सूचिकार चांदोकर माहिती देताना म्हणतात की मौनी कवी नाशिकच्या रघुनाथाचार्य यांचा पुत्र असून त्यांचा समाधिशक १७९८ असा आहे. 'लघुबोध' ग्रंथाचे कर्तृत्व ते मौनी कवीला देतात. ग्रंथकाळ १७४० मानतात.

उतारवयात मौनीस्वामींनी मुंबईत राहून भक्तिमार्गाचा प्रसार केला. डॉ. कुंटे, डॉ. भाऊदाजी, नानाशंकरशेट, श्रीधर विठ्ठल दाते, म.चि.आपटे यांसारखे मोठे लोक त्यांचे शिष्य आहे. मौनींचा मुलगा वामनराव आप्पा यांनी त्यांचे पद्यात्मक चरित्र लिहिले आहे. स्वामींनी शके १७९८त देह ठेवला. त्यांची समाधि मुंबईत ठाकुरद्वारांत कोळ्याच्या वाडींत आहे.

◆

---

# वाचकांचा पत्रव्यवहार

दि. २० सप्टेंबर २०१८

प्रति
**आदरणीय श्री. रमाकांत विद्वांसजी**
कार्यकारी अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान,
मुंबई.

नमस्कार

रविवार दि. ९ सप्टेंबर २०१८ रोजी प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत, मुंबई येथे माझा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सहकुटुंब आमंत्रण होते त्यामुळे विशेष आनंद वाटला. एकूण सर्वच कार्यक्रम अत्यंत हृद्य होता. अन्य अनेक जेष्ठ मान्यवरांबरोबरच माझ्यासारख्या नवख्या तरुणाच्या कामाचाही गौरव केला हेही खूपच महत्त्वाचे. जाण्यायेण्याची व्यवस्थादेखील अगदी चोख होती. माझ्या कामाच्या प्रेझेन्टेशन नंतर उपस्थित कुलबांधवांचा जो प्रतिसाद मिळाला तो तर मला अनपेक्षितच होता. सौ. मंजिरीताईने माझी मुलाखत ठरविण्याकरिता लगेचच दूरदर्शनला फोन केला. एका कुलबांधवाने फुल न फुलाची पाकळी म्हणत चेक हातात ठेवला. मराठे इन्फोटेकच्या श्री. विनय मराठे यांनी website करून देतो असे तत्काळ सांगितले. इतर अनेक कुलबांधवानी अन्योन्य मार्गांनी काही मदत देता येते का ते पाहून कळवतो, म्हणून सांगितले.

माझी Zee २४ तास वरील मुलाखत पाहून पुणे शाखेचे जेष्ठ सभासद श्री. अरुणराव मराठे आणि श्री. विजयराव मराठे हे माझ्या प्रयोगशाळेत आले. सर्व विषय मनापासून समजावून घेतला आणि माझ्या कामाचा आवाका लक्षात येताच अत्यंत अगत्यपूर्वक या कार्यक्रमाचा प्रस्ताव ठेवला. आपल्या अगत्यपूर्वक निमंत्रणामुळे हा एक प्रकारे घरचाच कार्यक्रम वाटला व मला माझ्या व्यस्त दिनक्रमामुळे बाहेरगावी जाण्यासाठी वेगळा वेळ काढणे शक्य नसले तरी देखील, नाही म्हणता आले नाही हेच खरे.

प्रतिष्ठानने आणि कुलबांधवांनी दाखविलेल्या या अगत्य व प्रोत्साहानामुळे माझा व माझ्या सौ. अश्विनी यांचा उत्साह द्विगुणीत झाला आहे आणि हाती घेतलेला हा आगळावेगळा प्रकल्प यशस्वी करायचाच असा आम्ही दोघांनी पुन्हा एकदा ठाम निश्चय केलेला आहे.

याप्रमाणे एकूण नेटका कार्यक्रम, अगत्य व प्रतिसाद यामुळे आम्ही भारावून गेलो आहोत व आपल्याच कुलबांधवांचे आभार मानतानाच त्यांच्या प्रेमाच्या ऋणात राहणे आम्हाला योग्य वाटते, म्हणून हा ऋणनिर्देश.

आपुलकी आहेच, ती वृद्धींगत व्हावी ही विनंती.
कळावे.
आपला
**डॉ. राहूल रमेश मराठे**



**डॉ. राहुल मराठे प्रात्यक्षिक दाखवतांना**




# वार्षिक सर्वसाधारण सभा
# मराठे प्रतिष्ठान क्षणचित्रे...

श्री. विनय मराठे सत्कारास उत्तर देतांना




डॉ. वसुधाताई आपटे सत्कारास उत्तर देतांना



मराठे प्रतिष्ठानचे विश्वस्त सत्कारामुर्तींसह




श्री. वसंतराव मराठे सत्काराचा स्वीकार करतांना



श्री. सदाशिवराव जोशी सत्काराचा स्वीकार करतांना



डॉ. वसुधाताई सुलभाताईंच्या हस्ते मानचिन्ह स्वीकारतांना




श्री. विनय, श्रीमती. वैशाली मराठे यांच्या हस्ते
उद्योजकता पुरस्कार स्वीकारतांना



**श्री. मोहनराव मराठे सत्कार स्वीकारतांना**

## प्रतिष्ठानच्या या वर्षीच्या 'घरगुती गणेशोत्सव सजावट' स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु. १००१/- | प्रांजली देवेंद्र मराठे, डोंबिवली. |
| द्वितीय पारितोषिक | रु. ७५१/- | शशांक मराठे, बेळगावी, कर्नाटक |
| तृतीय पारितोषिक | रु. ५०१/- | श्रीमती. सुनंदा अरुण मराठे, कणकवली |



**प्रथम पारितोषिक : प्रांजली देवेंद्र मराठे, डोंबिवली.**



**द्वितीय पारितोषिक : शशांक मराठे बेळगावी, कर्नाटक**



**तृतीय पारितोषिक : श्रीमती. सुनंदा अरुण मराठे, कणकवली**

**BOOK POST**

If undelivered, Please return to

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.



पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**